# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १९७ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०२ आश्विन शके १९४८, गुरूवार दि.२४ सप्टेंबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

### महाराष्ट्राचे आराध्य दैवत: गणेशोत्सवाचा वारसा आणि अष्टविनायकाचा महिमा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

भारतीय संस्कृतीमध्ये आणि विशेषतः महाराष्ट्राच्या लोकजीवनात गणपती या देवतेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हिंदू धर्मात बुद्धीची देवता, कला-विज्ञानाचा संरक्षक आणि विघ्नहर्ता म्हणून श्री गणेशाची प्रथम पूजा केली जाते. कोणत्याही शुभ कार्याची किंवा मंगल प्रसंगाची सुरुवात करताना गणपतीचे स्मरण करण्याची प्राचीन परंपरा आहे. पौराणिक संदर्भानुसार, शिवपुराण आणि मुद्गल पुराणात गणेशाच्या उत्पत्तीच्या अनेक कथा आढळतात. माता पार्वतीने आपल्या अंगावरील मळापासून एक बालमूर्ती तयार केली आणि ती सजीव केली, ही कथा सर्वश्रुत आहे. प्राचीन काळापासून भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणेश पूजेची परंपरा चालत आली असून, आज हा केवळ एक धार्मिक विधी न राहता तो एक व्यापक लोकोत्सव बनला आहे.

गणेशोत्सवाचा इतिहास पाहता, तो एका प्रदीर्घ स्थित्यंतराचा साक्षीदार राहिला आहे. सुरुवातीला घराघरांपुरता आणि वाड्यांमधला हा उत्सव पेशवे काळात अधिक राजमान्य आणि वैभवशाली बनला. पेशव्यांचे आराध्य दैवत असल्यामुळे या काळात गणेश पूजेला आणि अष्टविनायकांच्या स्थानांना मोठा आश्रय मिळाला. पुढे १८९३ मध्ये लोकमान्य टिळकांनी या उत्सवाला एक नवे आणि व्यापक परिमाण दिले. ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीत विखुरलेल्या समाजाला एकत्र आणण्यासाठी, त्यांच्यामध्ये राष्ट्रीयत्वाची आणि एकतेची भावना जागृत करण्यासाठी टिळकांनी घरगुती गणेशोत्सवाचे रूपांतर 'सार्वजनिक गणेशोत्सवात' केले. जातीभेद आणि वर्गभेद बाजूला सारून सर्वसामान्यांना एकाच मंचावर आणण्याचे हे एक अत्यंत प्रभावी माध्यम ठरले.

गणेशोत्सवाचे सामाजिक महत्त्व आजच्या काळातही तितकेच प्रस्तुत आहे. हा उत्सव समाज बांधणी, एकता आणि सांस्कृतिक प्रबोधनाचे एक मुख्य केंद्र आहे. या दहा दिवसांच्या काळात शेजारी, मित्र आणि नातेवाईक एकत्र येतात, ज्यामुळे सामाजिक सलोखा आणि जिव्हाळा वाढीस लागतो. उत्सवादरम्यान आयोजित केली जाणारी व्याख्याने, कीर्तने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांतून अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य, शिक्षण आणि देशसेवा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर प्रबोधन केले जाते. याशिवाय, स्थानिक कलाकारांना, वादकांना, आणि उदयोन्मुख विद्यार्थ्यांना आपली कला समाजासमोर मांडण्यासाठी हा उत्सव एक उत्तम हक्काचे व्यासपीठ मिळवून देतो.

याच गणेशाच्या भक्तीचा परमोच्च आविष्कार म्हणजे महाराष्ट्रातील अष्टविनायक दर्शन. या आठ स्वयंभू आणि जागृत मानल्या जाणाऱ्या मंदिरांना ऐतिहासिक व अध्यात्मिकदृष्ट्या मोठे महत्त्व आहे. यातील पहिला गणपती म्हणजे बारामती तालुक्यातील मोरगावचा मयुरेश्वर. बहामनी आणि आदिलशाही काळातील स्थापत्यशैलीचा प्रभाव असणाऱ्या या मंदिरात, ब्रम्हा, विष्णू, महेश, सूर्य व शक्ती या पंचदेवतांनी या मूर्तीची स्थापना केल्याचे मानले जाते. सिंध नावाच्या उन्मत्त राक्षसाचा वध करण्यासाठी गणेशाने मोरावर आरूढ होऊन युद्ध केले, त्यावरून याला मयुरेश्वर हे नाव पडले. यानंतर हवेली तालुक्यातील थेऊरचा चिंतामणी येतो. ब्रह्मदेवाला ज्या ठिकाणी तपश्चर्येने चित्तस्थैर्य प्राप्त झाले, त्या ठिकाणाला स्थावर (थेऊर) असे नाव पडले आणि मनातील चिंता दूर करणाऱ्या या गणेशाला चिंतामणी म्हटले गेले. थोरले माधवराव पेशवे यांनी या मंदिराचा विस्तार करत त्याला भव्यता प्राप्त करून दिली.

जुन्नर तालुक्यातील डोंगररांगांमध्ये वसलेला लेण्याद्रीचा गिरीजात्मज हा अष्टविनायकांतील एकमेव असा गणपती आहे जो गुहेत विराजमान आहे. सात क्रमांकाच्या लेणीत एका मोठ्या शिळेत कोरलेली ही मूर्ती आणि त्याला कोणताही खांब नसलेला भव्य सभामंडप हे भारतीय पाषाणकलेचे उत्तम उदाहरण आहे. पार्वतीने (गिरीजा) पुत्रप्राप्तीसाठी येथे तपश्चर्या केली आणि तिच्या भक्तीतून श्री गणेश प्रकट झाले, म्हणून याला गिरीजात्मज म्हणतात. शिरूर तालुक्यातील रांजणगावचा महागणपती देखील असाच ऐतिहासिक वारसा सांगतो. गृत्समद ऋषींच्या शिंकेतून जन्मलेल्या त्रिपुरासुराने त्रिलोकात हाहाकार माजवला होता. तेव्हा भगवान शंकरांनी याच ठिकाणी गणेशाची पार्थिव मूर्ती स्थापन करून तपश्चर्या केली आणि महागणपतीच्या वरदानाने त्रिपुरासुराचा वध केला. पेशवे, मल्हारराव होळकर आणि महादजी शिंदे यांनी या मंदिराच्या बांधकामात मोठे योगदान दिले.

नगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील सिद्धटेकचा सिद्धिविनायक हा अष्टविनायकांतील एकमेव उजव्या सोंडेचा गणपती आहे. भगवान विष्णूंनी मधू व कैटभ या दैत्यांचा वध करण्यापूर्वी याच टेकडीवर गणपतीची आराधना करून सिद्धी प्राप्त केली होती. विशेष म्हणजे, या मंदिराचे बांधकाम राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केले असून, त्यांच्या वास्तुकलेचा आणि अध्यात्मिक दूरदृष्टीचा ठसा या मंदिरावर स्पष्टपणे दिसून येतो. जुन्नर तालुक्यातील ओझरचा विघ्नहर गणपती हा विघ्नासूराचा वध करणारा आणि नवसाला पावणारा देव मानला जातो. वसईची मोहीम फत्ते केल्यानंतर चिमाजी अप्पांनी या मंदिराचा जीर्णोद्धार करून त्यावर सुवर्ण कळस चढवला होता.

रायगड जिल्ह्यातील महडचा वरदविनायक हा एका भक्ताला तळ्यात मिळालेल्या स्वयंभू मूर्तीसाठी प्रसिद्ध आहे. १७२५ च्या सुमारास बांधले गेलेले हे साधे आणि कौलारू मंदिर भक्तांना गणेशाच्या अत्यंत जवळ जाऊन दर्शन घेण्याची अनुभूती देते. तर, अष्टविनायकांतील शेवटचा आणि भक्ताच्या नावाने ओळखला जाणारा एकमेव गणपती म्हणजे पालीचा श्री बल्लाळेश्वर. बल्लाळ नावाच्या भक्ताच्या अनन्यसाधारण भक्तीमुळे प्रसन्न होऊन गणपतीने येथे वास्तव्य केले. नाना फडणीसांनी १७७० च्या सुमारास या मंदिराचा पाषाणी जीर्णोद्धार केला. सूर्याच्या उत्तरायणात सूर्योदयाची पहिली किरणे थेट मूर्तीवर पडतील, अशी या मंदिराची अचूक आणि शास्त्रीय बांधणी आहे.

भाद्रपद शुद्ध चतुर्थीला सुरू होणारा हा बुद्धी आणि मांगल्याचा उत्सव दहा दिवस अवघा महाराष्ट्र व्यापून उरतो. घराघरांतील साध्या पूजेपासून ते अष्टविनायकांच्या ऐतिहासिक मंदिरांपर्यंत आणि सार्वजनिक मंडळांच्या भव्य देखाव्यांपर्यंत सर्वत्र एकच चैतन्य सळसळत असते. अनंत चतुर्दशीच्या दिवशी ''गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'' आणि ''पुनरागमनाय च'' या आर्त प्रार्थनेसह जेव्हा गणपतीला निरोप दिला जातो, तेव्हा तो केवळ एका मूर्तीचे विसर्जन नसून, पुढचे वर्षभर पुरेल एवढी सकारात्मक ऊर्जा, सामाजिक बांधिलकी आणि मांगल्य समाजात रुजवून जाण्याचा तो एक चिरंतन प्रवास असतो.

## आठवीतील विराटनी रुबिक्स क्यूब मधून साकारला सुंदर गणेश

ज्योतिर्मय 📖 साहित्य

छत्रपती संभाजीनगर /सुधीर कोर्टीकर : इयत्ता आठवीत केंब्रिज स्कूल मध्ये शिकणाऱ्या १४ वर्षीय विराट विशाल काडगांवकर याने रुबिक्स क्यूब मोजेक कलेतून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. वयाच्या अवघ्या १०व्या वर्षी रुबिक्स क्यूब सोडवायला शिकलेल्या विराटने आतापर्यंत तब्बल १८ क्यूब मोजेक साकारले आहेत.

विराटने साकारलेल्या मोजेकमध्ये श्री स्वामी समर्थ, श्री गणेश, नरेंद्र मोदीजी, विराट कोहली, मोहन भागवतजी, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, केंब्रिज स्कूल च्या प्रिन्सिपॉल फ्लावि मॅम अशा अनेक मान्यवरांचे तसेच विविध विषयांवरील मोजेकचा समावेश आहे.

प्रत्येक मोजेक साकारण्या साठी सुमारे ६०० रुबिक्स क्यूब वापरले जातात. विविध रंगांच्या क्यूबची अचूक मांडणी करून त्यातून व्यक्तींचे चेहरे आणि विविध आकृत्या साकारण्याचे काम विराट करतो. या कलेसाठीनियोजन, संयम,



रुबिक्स क्यूब मधून साकारलेली गणपतीची कलाकृती.



कलावंत.. विराट विशाल काडगांवकर

निरीक्षणशक्ती, कल्पकता आणि सातत्य आवश्यक असते.

लहानपणा पासूनच वेगवेगळ्या गोष्टी शिकण्याची आवड असलेल्या विराटने रुबिक्स क्यूबच्या रंगीबेरंगी विश्वाला कलात्मक रूप दिले. केवळ क्यूब सोडवण्यापासून सुरू झालेला त्याचा प्रवास आज ६०० क्यूबच्या भव्य मोजेक कलाकृतींपर्यंत पोहोचला आहे.

विराटला त्याची आई स्फुर्ती काडगांवकर यांच्याकडून कलेचा वारसा आणि सर्जनशीलतेची प्रेरणा मिळाली आहे. विविध कलात्मक उपक्रमांमध्ये सक्रिय असलेल्या आईच्या प्रोत्साहनामुळे विराटला आपल्या कल्पनांना नवे रूप देण्याची प्रेरणा मिळत आहे. त्याचबरोबर त्याची बहीण वंशिका हीदेखील विराटच्या या क्यूब मोजेकच्या प्रवासात त्याला उत्साहाने साथ देते आणि मोजेक तयार करताना आवश्यक ती मदत करते.

कुटुंबीयांचे प्रोत्साहन, स्वतःची आवड आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या जोरावर विराटने रुबिक्स क्यूबला केवळ खेळ किंवा कोडे न ठेवता एक आगळेवेगळे कलामाध्यम बनवले आहे. वयाच्या १४व्या वर्षी एवढ्या मोठ्या प्रमाणावर क्यूब मोजेक साकारून विराटने आपल्या कल्पकतेला, आवडीला आणि सातत्याला एक आगळेवेगळे कलात्मक रूप दिले आहे.

## बाप्पाशी संवाद.. एकपात्री लेखन.....

ज्योतिर्मय 📖 साहित्य

।। श्री गणेशाय नमः ।।

बाप्पा...! अरे गणपती बाप्पा...

किती दिवस वाट पाहत होते रे तुझ्या आगमनाची... आज तू आलास...

तुझ्या येण्याने घरात आनंद आला. घर स्वच्छ झाले.

गल्लीमधे मुलाबाळांचा उत्साह वाढला. सगळीकडे रोषणाई झाली, लाईट माळ लागली ढोल-ताशे वाजू लागले.. मजा आहे बाबा तुझी..

पण बाप्पा... एक विचारू?

तू खरंच आलास का रे?

कारण तुझी मूर्ती तर घराघरात आली... पण तुझ्यातली माणुसकी मला तर दिसेना, तुझ्यातली संवेदनक्षम विचार दिसेना. असं का झालं रे?

तुझ्या कानावर मोठमोठे आवाज पडतात ना बाप्पा? डीजेचे, फटाक्यांचे,घोषणांचे,

पण कधी एखाद्या गरीब कुटुंबाचा लाचारीसाठी दबलेला आवाज ऐकू येतो का रे? हल्ली मुली, बायका सुरक्षित नाहीत रे.. त्यांच्या वर अत्याचार होतोय त्यांची किंकाळी ऐकू येते का रे?

अरे समाज एवढा बिघडलाय की तोंडात शिव्या आणि हातात हत्यारे असे चालू आहे. जरा समजावून सांग रे या सर्वांनाच. माणुसकीची जरा शिकवण दे. चांगले विचार दे. नम्रता शिकव. अबालवृद्ध यांची काळजी घ्यायला शिकव. तस पाहिले तर या गोष्टी का शिकवाव्या लागतात रे...

माणूस बदललाय. माणुसकी संपत चाललीय. नको बाप्पा असे पहायला लावू. परत शांतीचे, समतेचे, समृद्धीचे राज्य या वसुंधरेवर घेऊन ये.

''बाप्पा, माझ्या बाबांना काम काम मिळू दे... मला काम मिळू दे,'' अशी वाक्य कानी आली तर त्यांना काम दे बरका.. त्यांच्या आवाजाला हाक दे... कधी एखादी मुलगी जर बोलली की ''बाप्पा, मला खूप शिकायचंय... मला उंच भरारी घ्यायची आहे.माझ्या कुटुंबाला साथ द्यायची आहे '' तेव्हा तिच्या स्वप्नांना तू नक्की बळ दे बर.. बाप्पा...आम्ही तुझी १० दिवस पूजा मनोभावे करतो. कोणी ५ दिवस करतो. कोणी अगदी दीड दिवस तुला घरी आणतो. पण सर्व भक्ती रसात बुडून जातात.



लेखिका - वसुधा वैभव नाईक, पुणे. मो. 9823582116

आम्ही तुला मोदक देतो. लाडू देतो. गोड नैवेद्य देतो. तुझ्या आवडीचे फुलं वाहतो. पण तुझ्या शिकवणीचा एक छोटासा प्रसाद मात्र विसरतो..

तू माणूसकी शिकवली.एकोपा शिकवला. उत्साह शिकवला.एकत्र येऊन कार्य करायला शिकवलं पण सर्व शिकवण माणूस विसरत चालला आहे.

तू बुद्धीचा देव आहेस ना..

मग आमची बुद्धी कुठे दुसरीकडे चालली बाप्पा.. मुले परीक्षेत कॉपी करतात.वरचे लोकं लाच देताना खोटं बोलतात. दुसऱ्याला फसवतात.जात-पात, धर्म, भाषा यावरून माणसामाणसांत भिंती उभ्या करत आहेत... हे सर्व थांबवा हो बाप्पा.. सगळीकडचा अन्याय अत्याचार भ्रष्टाचार थांबायला हवा.

बाप्पा...

तुझं वाहन एवढंसं उंदीरमामा आणि तरी तू एवढ्या मोठ्या जगाला सांगतो की अहंकार कितीही मोठा असला, तरी नम्रता त्याला जिंकू शकते.

पण आम्ही?

आम्ही तुझी मूर्ती बदलतो. सजावट बदलतो. मिरवणूक सुद्धा बदलतो.

पण स्वतःचा स्वभाव काही बदलत नाही. अगदी थोडी माणसे आहेत स्वतःचा स्वभाव बदलतात.

बाप्पा ऐक ना थोडं माझं यावर्षी मला तुझ्याकडे काही मागायचंच नाही.

फक्त एक दे...

चांगलं मन दे.

दुसऱ्याच्या दुःखात धावून जाण्याची संवेदना दे.

चुकीच्या गोष्टींविरुद्ध आवाज उठवण्याचं धैर्य दे.

आई-वडिलांचा आदर करण्याची बुद्धी दे.

निसर्गाची काळजी घेण्याची जाणीव दे.

आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे

माणसाला माणूस म्हणून पाहण्याची कला दे. माणुसकीच्या चार गोष्टी समजते ना घ्यायला शिकव.

बाप्पा...

तुझं विसर्जन हे होणारच आहे. ढोल ताशांच्या गजरात तुला निरोप दिला जाईल. तुझी मूर्ति मोठ्या टाकीमध्ये नदीमध्ये, समुद्रामध्ये विसर्जन केली जाईल.

पण एक उपाय सुचवा कसा वाटतो बघ तुला पटला तर...

प्रत्येक घराघरातील छोट्या मोठ्या तुझ्या ज्या मूर्ती आहेत त्या मूर्ती विसर्जन करण्यापेक्षा पाण्यात न काढाव्यात आणि त्या एका एका संघटनेला द्याव्यात अशी संघटना कि ती संघटना या मूर्तींचा पुनर्वापर करेल. यातून काय होईल पर्यावरणाचे प्रदूषण होणार नाही. हानी होणार नाही. आणि मुर्त्यांचे पावित्र्य जपले जाईल.तसेच पुढच्या वर्षी त्याला रंगरंगोटी देऊन त्या मूर्तींचा पुनर्वापर केला जाईल कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत.

बघ बाप्पा पटलं तर....

बाप्पा माझे सर्व विचार तू ऐकून घेतलेस खूप खूप धन्यवाद रे....

बाप्पा - तथास्तु.

गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लवकर या....

## तारे जमीनपर.....

ज्योतिर्मय 📖 साहित्य

रोहित सावंत आमच्या 'लोकमंगल हायस्कूल' नागेवाडी-कुशी चा माजी विद्यार्थी, दोन दिवसापूर्वी शाळेने त्याला गणेशोत्सवानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून शाळेत बोलविले होते. आपण ज्या शाळेत शिकलो त्या शाळेत प्रमुख पाहुणे म्हणून जाण्यातील आनंद अवर्णनीय असतो. आपली शाळा ही आपल्या आयुष्यातील सुख-दुःखाचा हळवा कोपरा असतो. शाळेमधील आठवणी कायमच त्या व्यक्तिला आयुष्यभर साद घालत असतात. रोहित आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांशी हितगुज करीत असताना सांगत होता... ज्या शाळेने मला घडविले तसेच ज्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाने स्वतःच्या पायावर उभे राहण्याची प्रेरणा मिळाली त्या शाळेत सोळा वर्षानंतर येण्याची संधी मला मिळत आहे. शाळेचे प्र. मुख्याध्यापक आणि माझ्या विद्यार्थी दशेतील इंग्रजीचे आवडते शिक्षक शशीकांत जमदाडे यांचा मला या कार्यक्रमासाठी फोन आला आणि मी आनंदलो. ज्या शाळेमुळे मी इंजिनीअर झालो त्याच शाळेत इंजिनीअर डे ला मला येता आले हा माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय दिवस आहे.

२००८ साली रोहित लहू सावंत याने आमच्या या हायस्कूलमध्ये नववीला अचानक प्रवेश घेतला. आमच्या या शाळेची शिस्त आणि अभ्यास करून घेण्याची हातोटी याची प्रसिद्धी नागेवाडी-कुशी परिसरातील जवळच्या सर्व गावांमध्ये आहे, त्याचा हा परिणाम. रोहित लिंब गावचा रहिवासी. लहू यशवंत सावंत आणि सीमा लहू सावंत यांचा रोहित हा एकुलता एक मुलगा. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असूनही रोहित याने शिकून इंजिनिअर व्हावे हे आई-वडीलांचे स्वप्न. रोहित आमच्या शाळेत आल्यानंतर नववी-दहावी या दोन वर्षात इंजिनीअर होण्याचे आई-वडीलांचे स्वप्न शिक्षकांच्या मार्गदर्शनाने शिकविण्याच्या पद्धतीमुळे आस्था वाढत जाऊन रोहित याचे झाले. रोहितचे दहावीचे वर्ष त्याच्या आयुष्याला कलाटणी देणारे ठरले. शाळेत शिकत असताना सर्व खेळांमध्ये सहभागी होत तसेच शाळेच्या उपक्रमामध्ये भाग घेत



रोहितने बोर्ड परीक्षेत गणित-सायन्स मध्ये एकशे पन्नास पैकी एकशे अडतीस मार्कस मिळविले. मराठीच्या, इंग्रजीच्या, सायन्स, गणित आणि हिंदीच्या शिक्षकांमुळे रोहितचे व्यक्तिमत्व पूर्ण बदलले आणि आत्मविश्वास मिळविलेला एक तरुण मुलगा म्हणून त्याची पुढील कारकिर्द चालू झाली.



शिरीष चिटणीस
सातारा ७५८८८६५०५१

घरची जेमतेम शेती पण वडीलांनी आणि आईने पडेल ती कामे अंगावर घेऊन रोहितच्या पुढील शिक्षणासाठी कंबर कसली. लाल बहादूर शास्त्री कॉलेजमध्ये ११, १२ सायन्स केल्यावर रोहितला गौरीशंकर पॉलिटेक्निक मधील सिव्हील इंजिनीअरच्या डिप्लोमासाठी त्याचे वडील लहू सावंत यांनी पतसंस्थेमधून कर्ज काढून प्रवेश मिळवून दिला. ते मुलाच्या शिक्षणासाठी शेती व्यवसायाबरोबर हमाली पण करीत असत. रोहितला आपल्या खडतर परिस्थितीची जाणीव असल्याने त्याने कष्टपूर्वक सिव्हील डिप्लोमा इंजिनीअर हा अभ्यासक्रम फर्स्ट क्लास मिळवून पूर्ण केला. नेहमीप्रमाणे सर्वसामान्याला जो प्रश्न पुढे असतो तो नोकरीचा. पुणे येथे नामांकित पवनचक्कीच्या कंपनीमध्ये त्याच्या हुशारीमुळे रोहित क्वालिटी कंट्रोल इंजिनियर म्हणून रुजू झाला आणि त्याने जवळपास दीड वर्षे तेथे काम केले. सातारा पंचायत समितीमध्ये एका शासकीय संस्थेमार्फत त्याला जॉब मिळाला. तो याठिकाणी गेल्या दहा वर्षापासून घरकुल विभागात ग्रामीण गृहनिर्माण अभियंता म्हणून काम करीत आहे. या विभागात काम करीत असताना रोहितला गोरगरीब लोकांच्या निवा-याचा प्रश्न सोडविता येतो. यासोबतच लहानपणापासूनच व्यावसायिक दृष्टिकोन असल्यामुळे वडील लहू सावंत यांना बरोबर घेऊन त्याने एक कंपनी रजिस्टर करून रोहितने वडीलांच्या सहाय्याने १६९ घरांचे काम पूर्ण केले आहे. २०१९ साली लग्न झाल्यानंतर आपल्या पत्नीला सागवानी चौकट दरवाजा विकण्याचे दुकान काढून दिले. रोहित ची पत्नी आणि वडील कन्स्ट्रक्शन व्यवसाय सांभाळतात.

आम्ही आमच्या 'लोकमंगल ग्रुप' शिक्षण संस्थेच्या पाचही शाळांमध्ये आम्ही माजी विद्यार्थांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलवितो आणि त्यांनी केलेल्या प्रगतीची माहिती तेच विद्यार्थ्यांना देतात,जे विद्यार्थ्यांना पुढील कारकिर्दीसाठी ध्येय म्हणून उपयोगी पडते.



# जात्यावरच्या ओव्या......

बैलपोळ्याचा सण
जोडी खिल्लार बैलाची
याच्या पायी नांदती
घरी पाऊले लक्ष्मीची ||८५६||

बैलपोळ्याचा सण
पायी चढवले तोडे
झुल, बाशिंग,कासरे
फिके पडलेत घोडे ||८५७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७५

ज्योतिर्मय साहित्य

पण नामाचा महिमा वारंवार सांगूनही काही लोकांना पटत नाही. अशा लोकांना समजावणे अवघड असते. स्वतः शोध घेतल्याशिवाय त्यांची खात्री पटत नाही. त्यांच्या मनात अपार शंका असतात. तेम्हणतात, '' यांना सांगायला काय जाते ? नुसत्या नामामध्ये एवढे सामर्थ्य असणं कसं काय शक्य आहे ? नुसतं नाम घेऊन काय होणार आहे ? कशाला त्यात वेळ घालवायचा ?''






अशा लोकांसाठी समर्थ म्हणतात की माझे बोलणे तुम्हाला खरे वाटत नसेल तर स्वतः खात्री करून घ्या. विविध ग्रंथ, पुराणे, वेद, उपनिषदे अभ्यास. संतांच्या वचनांचे वाचन करा. हे सगळे वाचल्यानंतर तुमच्या लक्षात येईल की सगळे ग्रंथ, पोथ्या पुराणे एकमुखाने भगवंताच्या नामाचा उद्घोष करीत आहेत. सर्व संतांनी देखील नामाचा महिमा एकमुखाने गायिला आहे. हे जेव्हा तुमच्या लक्षात येईल, तेव्हा आपल्या मनातील व्यर्थ शंकांचा त्याग करा. सर्व संशय टाकून द्या. संशयात्मा विनश्यति असे म्हणतात. परमेश्वराचे नाम हेच सर्व सार असल्याची जेव्हा खात्री होईल तेव्हा सगळ्या शंका टाकून देऊन निःशंक मनाने भगवंताचे नाम घ्या. कवी अशोक परांजपे आपल्या एका सुंदर गीतात म्हणतात

नाम आहे आदि अंती, नाम सर्व सार ।
आहे बुडत्याला नौका ठेवली जीवनी आधार ।।

या गीताच्या शेवटच्या कडव्यात ते म्हणतात

नाम जपो वाचा नित्य श्वासांतही नाम
नाममय होवो देवा माझे नित्य कर्म

असे आपलेही कर्म नाममय व्हावे. संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात

नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा ।
वायां आणिका पंथा जासील झणीं ।।

म्हणूनच समर्थ आपल्याला सांगतात की प्रभात समयी भगवंताचे चिंतन करावे. म्हणजे दिवसभर त्याचे स्मरण राहते.

स्वसंवाद : १. निसर्गातील प्रत्येक घटक जर केवळ सार ग्रहण करत असेल, तर मी मात्र संसारातील असार (क्षणभंगुर) गोष्टींनाच आयुष्यभराचे सत्य मानून त्यात गुंतलो आहे का?

२. भगवंताच्या नामाबद्दल किंवा भक्तीबद्दल माझ्या मनात नकळत काही वाउगा (व्यर्थ) संशय किंवा तर्क-वितर्क येत राहतात का?

३. सर्व संतांनी आणि श्रेष्ठ ग्रंथांनी ज्या नामाला जीवनाचा आधार म्हटले आहे, त्या नामाचा अनुभव मी स्वतः कधी निःशंक मनाने घेऊन पाहिला आहे का?

४. माझे नित्य कर्म नाममय व्हावे यासाठी मी रोजच्या धावपळीत किती जागृत राहतो? **(क्रमशः)**




# ॥ संजय उवाच... ॥



@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ऊर्जा

ऊर्जा म्हणजे शक्ती हिचे वेगवेगळे स्रोत आहेत, सूर्यापासून ऊर्जा मिळते, चांगले विचार सुद्धा ऊर्जा देतात तर चांगली संगत सुद्धा, मार्गदर्शनातून ऊर्जा मिळते, चांगल्या कामातून ऊर्जा मिळते, प्रामाणिक मेहनतीतून ऊर्जा मिळते. तिचा चांगला वापर करता आला पाहिजे.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# नामाचे सूक्ष्म स्वरूप

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वतःच्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता' राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दु:खाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***

# ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर,
पुणे

## आपले सण आपले उत्सव महालक्ष्मी/ गौरी

### महालक्ष्मी पूजन करताना आपले भाव असे असावेत

महालक्ष्मीच्या पूजनासाठी जे साहित्य उपलब्ध असेल, ते घेऊन मातेचे पूजन करावे. मातेचे वर्णन असे आहे.. जिचे दात शुभ्र आहेत. याशिवाय जिला तीन लाल नेत्र आहेत. जिचे शरीर सोन्यासारख्या तेज पुंज कांतिने चमकते आहे. जी विरक्त आहे. त्या सुंदर जेष्ठा देवीचे मी ध्यान करतो. हे माते तू सूर आणि असुर दोघांनाही वंद्य असणारी आहेस.

माते यावे! आपण सर्व देवी मध्ये जेष्ठ आहात. आपण आमचे घरी यावे! मी आपणास आवाहन करतो आहे. श्वेत आसनावर विराजमान व श्वेत वस्त्र धारण केलेल्या माते, तुम्हाला आवाहन !आपण एका करा मध्ये पुस्तक, एका कराने वरद मुद्रा घेतलेली आहे. अन्य हातात शस्त्र धारण केलेले आहेत. अशी माझी लक्ष्मी माता, आपणास मी वारंवार वंदन करीत आहे. हे समुद्रमंथनातून उत्पन्न झालेली सत्य वचनी माते, तुला आसन देतो. त्यावर कृपा करून विराजमान हो. तुला सुगंधी कापूर पुष्प युक्त जलाने अर्घ्य देत आहे. हे जेष्ठा कनिष्ठा माते, मी आपणास नमस्कार करतो. हे तपा मध्ये निष्ठा असणार्या माते तू आता आचमन कर !मी आता आपणास पंचामृताने स्नान घालीत आहे. या नंतर मंदाकिनी तील जलाने मी स्नान घालणार आहे. आपणासाठी मी आता धूत वस्त्र देत आहे. या वस्त्रांचा आपण स्वीकार करावा. मी आपणास सौभाग्य द्रव्य हळद, कुंकू व चंदन अर्पण करीत आहे. आपणास मी आता अक्षत, पैंजण, कंबर पट्टा, बांगड्या, नथ गळ्यातील दागिने, अर्पण करीत आहे. मी आपणास फुलांच्या माळा अर्पण करीत आहे. आपणा समोर धूप, दीप लावीत आहे. आपणास सुग्रास भोजनाचा नैवेद्य दाखवीत आहे. भोजनानंतर आपणास हात धुण्यास पाणी देत आहे. आपणास तांबूल विडा देत आहे. (क्रमश:)

# सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

## "एक पत्र बापाचे मुलाला"

मित्रांनो, आपल्यापैकी बर्याच जणांनी शाळेत तसबिरमधे लावलेले अब्राहम लिंकनने हेड-मास्तरला लिहिलेले पत्र वाचले असेल. तसेच काहीसे एक पत्र मी थोडक्यात तुम्हाला वाचन करण्यासाठी देत आहे.या दुनियेत असा एकही मणुष्य नाही ज्याच्या जीवनात दुःख अडचणी नाहीत, आपण तर साधारण मणुष्य, सर्व गोष्टी माझ्या मनाप्रमाने झाल्या पाहिजे हा आग्रह दुःखाचे कारण आहे. आपण सर्वासी चांगले वागा.जी माणसे परिस्थितीला स्वतःची ताकद बनवतात, तिच यशस्वी होतात. यामुळे बाप लिहितो; जेव्हा सगळे तुझ्या विरोधात असतील व तुला दोष देत असतील, तर ही पृथ्वी व त्यातील प्रत्येक गोष्ट तुझीच होईल! सर्वांना संशय घेऊ दे, त्याचा फायदा तू स्वतःला घडविण्यासाठी कर! तुझ्या बद्दल खोट्या गोष्टी पसरावीत असतील व तू खोटे बोलत नसशील तर सर्व तुला मिळेल! स्वार्थी लोकांनी बदललेल्या गोष्टी स्विकारण्याचे धैर्य जर तुझ्याकडे असेल तर तू एक परिपूर्ण माणूस होशील!जर सामान्यासी तू सहज संवाद साधू शकलास तर,शत्रू किंवा मित्र तुला दुखवू शकत नाही!गरिबांना तू विसरत नसशील,सगळे तुला जर समान असतील, आणि जर तू जीवनातला प्रत्येक बहुमोल क्षण विधायक कार्यासाठी वापरशील तर..
तर बाळा, ही पृथ्वीवरील प्रत्येक गोष्ट तुझीच होईल आणि विशेष म्हणजे तू एक पूर्ण माणूस म्हणून तू स्वतःला धन्य समजशील!" तर असे हे एक पत्र. कसे वाटले.. गूड़ डे गुड मार्निंग स्वस्थ राहा मस्त राहा आणि सुखदुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा.

# ॥ श्री दत्त महिमा ॥




लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड

## दत्तात्रेय जनार्दन श्री एकनाथ

ज्योतिर्मय साहित्य

भानुदास एकनाथ भानुदास एकनाथ असा जय घोष त्या नंतर दत्तात्रय जनार्दन श्री एकनाथ असा जयघोष प्रतिष्ठान अर्थात आजचे पैठण तीर्थक्षेत्री समस्त वारकरी संप्रदाय करीत असतो.

पंढरपूरची वारी नंतर सर्वात मोठी वारी ही पैठणच्या नाथ षष्ठी ची असते याच वारकरी संप्रदाय व दत्त संप्रदाय यांचे अनोखे एकत्रिकरण आपणास आद्यपीठ वरद दत्त संस्थान येथे अनुभवायस येते.

महाराष्ट्रातील अनेक संतांच्या सोबत किंवा घरी पांडुरंगांनी मदत केल्याचा उल्लेख आढळतो त्या संतांकडे पांडुरंगांनी एक वेळ किंवा एक दिवस मदत केली असा उल्लेख आढळतो मात्र संत एकनाथ महाराज यांचेकडे एक नव्हे तर दोन देवतांनी तब्बल बारा वर्ष सेवा केली असा उल्लेख आहे.

भगवान श्रीकृष्णांनी श्रीखंड्या रूपाने त्यांच्याकडे पाणी वाहिले वस्त्र धुतले देवपूजा समयी चंदन उगाळून दिले



असाही उल्लेख याशिवाय प्रत्यक्ष दत्त महाराजांनी चोपदारकी केली असा उल्लेखही आढळतो.

सर्वज्ञ दासोपंत यांची दत्त महाराजांची सख्य भक्ती सर्व परिचित आहे त्यांचे नाथांच्या घरी आगमन प्रसंगी दत्त महाराज चोपदारकीच्या रूपात त्यांना दर्शन देतात.

याचे वर्णन संत निळोबाराय करताना एक सुंदर अभंग रचना केली आहे.

श्रीखंड्या चंदन उगाळीतो करी
धोत्र गंगातीरी धूत असे
सेवेसी तत्पर ठाईची ये ठाई
देवपूजे समयी तिष्ठतसे तसे
निळा म्हणे देव राबे त्यांच्या घरी
दत्त चोपदारी करीत तसे

अशाप्रकारे दोन देवता संत एकनाथ महाराजांच्या घरी वर्षानुवर्ष सेवा सेवा सेवा करीत होते.

आजही नाथांच्या वाड्याच्या दरवाजावर याचे प्रतीक म्हणून एका बाजूस भालदार चे चित्र रेखाटतात व दुसऱ्या बाजूस दत्त महाराजांचे प्रतिमा चित्र रेखाटलेले आपणास पहावयास मिळते.

आणि आजही तो मान राक्षस भुवन येथील आद्यपीठ श्री वरददत्त संस्थान येथील मठाधिपतीकडे आहे यात्राप्रसंगी त्यांना मानाचे श्रीफळ देऊन पादुका नाथ वाड्या बाहेर आणल्या जातात व पुढे मिरवणूक काढली जाते व सर्व भक्तांना त्यांचे दर्शन घेता येते.

असा हा ऐतिहासिक सोहळा आपणासही अनुभवता यावा यासाठी हा लेखन प्रपंच

गुरुदेव दत्त कृपा करा

# ॥ अभंग-माधव ॥




माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630

## अभंग

दीन दुबळ्यांची । सेवा जो करतो ।
देवच वसतो । त्याच्यामध्ये ॥१॥
भुकेल्याला देई । जो अन्नाचे दान ।
तो असे महान । देवासम ॥२॥
तहानलेल्याला । पाजीतो जो पाणी ।
तो असे भुवनी । जणू ईश ॥३॥
जो निराश्रिताला । देतसे आसरा ।
तोच असे खरा । देव रुपी ॥४॥
काही काही नर । फिरती उगाच ।
देव शोधण्यास । दारोदारी ॥५॥
ऐशा त्या नरांना । माहितच नसे ।
हृदी देव वसे । आपल्याच ॥६॥
माधव हा म्हणे । हृदयस्थ ईश ।
तोच परमेश । पूजा त्याला ॥७॥

# एक टोपली आठवणींची....



**ज्योतिर्मय साहित्य**

काही आठवणींना वय नसतं. काळ कितीही पुढे सरकला, तरी एखादा सुगंध, एखादी चव, एखादा ऋतू जुन्या आठवणींची दारं अलगद उघडतो. सीताफळांचा हंगाम आला की माझ्याही बाबतीत अगदी असंच होतं. झाडाला लगडलेली सीताफळं दिसली की डोळ्यांसमोर उभी राहते ती एक छोटीशी टोपली आणि त्या टोपलीसोबत माझा लाडका मामा.

मी शाळेत असताना मला आणि माझ्या ताईला सीताफळं फार आवडायची. आमची ही आवड मामाला चांगलीच ठाऊक होती. हंगाम सुरू झाला की आम्ही त्याच्या येण्याची आतुरतेने वाट पाहायचो. मामा दारात दिसला की आम्ही धावत जाऊन त्याला बिलगायचो. हातातली टोपली खाली ठेवून तो हसत म्हणायचा, ''बघा रे, तुमच्यासाठी काय आणलंय!''

टोपलीवरच्या फडक्याची गाठ सुटेपर्यंतचा तो क्षण काही औरच असायचा. गाठ सुटायची फडकं बाजूला व्हायचं आणि पानांमध्ये अलगद जपून ठेवलेली पिकलेली सीताफळं दिसायची. त्यांच्या गावरान गोड सुगंधाने क्षणात घर भरून जायचं.

आम्ही त्या सीताफळांवर अक्षरशः तुटून पडायचो आणि मामा आमच्या चेहऱ्यावरचा आनंद डोळ्यांत साठवत बसायचा.

तेव्हा त्या टोपलीत आम्हाला फक्त गोड सीताफळं दिसायची. आज मात्र त्या प्रत्येक फळामागे मामाचा निःशब्द प्रवास दिसतो. तो दूरवरून एस.टी.ने प्रवास करून यायचा. एक-दोन गाड्या बदलून, अनेक अडचणी सहन करूनही तो टोपली जपून आणायचा. कारण त्या टोपलीत फक्त सीताफळं नव्हती, तर त्याच्या लाडक्या भाच्यांसाठीचं प्रेम होतं.

वर्षे सरली, परिस्थिती बदलली; पण त्या आठवणी मनात तशाच राहिल्या. आज आमच्याकडे सीताफळाची मोठी बाग आहे. हंगाम आला की झाडं फळांनी लगडतात. पण या भरभराटीतही मन कधी कधी त्या एका छोट्याशा टोपलीसाठी हळवं होतं. कारण आज आमच्याकडे सीताफळं आहेत; पण ती जपून आणणारा मामा नाही.

किती विलक्षण आहे ना?



**मंगेश दौंडकर, पुणे,**
**मो.- 9890619354**

तेव्हा सीताफळांचा गोडवा जिभेवर उतरायचा; आज तो थेट मनात उतरतो. तेव्हा आम्ही फळ खायचो; आज त्या फळासोबत एक आठवण चाखतो. सीताफळांची चव अजूनही तशीच आहे; बदललं आहे ते फक्त त्या चवीकडे पाहण्याचं आमचं वय.

काही आठवणी जपाव्या लागत नाहीत. त्या स्वतःच आपल्याला जपून ठेवतात. माझ्यासाठी ती सीताफळांची टोपली अशीच एक आठवण आहे - काळाच्या ओघातही न कोमेजणारी, न विसरणारी, आणि प्रत्येक हंगामात नव्याने फुलणारी.

# साहित्यिक टोपणनाव बहाल सोहळा

**ज्योतिर्मय साहित्य**

**कवयित्री उज्वला धर्माधिकारी**

मनातील सुंदर भावना, जीवनातील अनुभव, नात्यांतील जिव्हाळा, माणुसकीची ऊब आणि संवेदनशील विचारांना आपल्या लेखणीच्या माध्यमातून शब्दरूप देणाऱ्या कवयित्री उज्वला धर्माधिकारी यांच्या साहित्यिक वाटचालीचा गौरव करताना माझी लेखणी साहित्य मंचाला मनस्वी आनंद होत आहे.

कविता ही मनाच्या अंतरंगातून उमटणाऱ्या भावनांची सुंदर भाषा आहे. जीवनातील अनुभवांना जेव्हा संवेदनशील मनाची साथ मिळते, तेव्हा त्यातून उमटणारे शब्द कधी हळवे, कधी प्रेरणादायी, तर कधी विचारांना चालना देणारे ठरतात. अशा भावपूर्ण साहित्यिक अभिव्यक्तीला एक स्वतंत्र ओळख देण्यासाठी साहित्यिक टोपणनावाचा हा सुंदर सन्मान.

कवयित्री उज्वला धर्माधिकारी यांच्या नावातील ''उज्वला'' या प्रकाशमय अर्थाला आणि त्यांच्या लेखणीतील भावविश्वाला साजेसे असे अर्थपूर्ण साहित्यिक टोपणनाव बहाल करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

**साहित्यिक टोपणनाव**

''उज्वला शब्दज्योती'' ''मनातील अंधार दूर करून विचारांना प्रकाश देणाऱ्या आणि शब्दांच्या ज्योतीतून भावविश्व उजळवणारी संवेदनशील लेखणी म्हणजे 'उज्वला शब्दज्योती'.''

**टोपणनावाचा भावार्थ**

उज्वला प्रकाशमान, तेजस्वी आणि आशावादी भावविश्वाचे प्रतीक; तसेच कवयित्रींच्या नावाशी जोडलेली आत्मीय ओळख.

शब्द विचार, भावना, अनुभव आणि जीवनातील सत्य मांडणारे प्रभावी माध्यम.



ज्योती प्रकाश, आशा, ज्ञान आणि सकारात्मक विचारांचे प्रतीक.

म्हणूनच ''उज्वला शब्दज्योती'' हे टोपणनाव त्यांच्या नावातील ''उज्वला'' आणि शब्दांतून प्रकाश निर्माण करणाऱ्या त्यांच्या साहित्यिक अभिव्यक्तीचा सुंदर मिलाफ दर्शवते.

**शब्दांची प्रकाशमय वाट**

साहित्यिकाची लेखणी केवळ भावना व्यक्त करत नाही, तर ती विचारांना दिशा देण्याचे कार्यही करते. जीवनातील सुख-दुःख, नाती, संघर्ष, आशा आणि अनुभवांना शब्दरूप देताना साहित्य वाचकांच्या मनात नवा विचार आणि सकारात्मकतेची ज्योत प्रज्वलित करू शकते.

''उज्वला शब्दज्योती'' ही साहित्यिक ओळख त्यांच्या संवेदनशील लेखणीची, सकारात्मक विचारांची आणि शब्दांतून प्रकाश पसरवणाऱ्या साहित्यिक प्रवासाची साक्ष ठरावी, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

एक स्वतंत्र साहित्यिक ओळख

साहित्यिक टोपणनाव हे केवळ नाव नसते; ते साहित्यिकाच्या लेखणीशी जोडलेले एक स्वतंत्र भावविश्व असते.

''उज्वला शब्दज्योती'' या नावातून कवयित्री उज्वला धर्माधिकारी यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाला एक सुंदर, अर्थपूर्ण आणि लक्षवेधी ओळख प्राप्त व्हावी.

त्यांच्या लेखणीतून शब्दांची ज्योत अशीच तेवत राहो, विचारांना नवा प्रकाश मिळत राहो, काव्यातून जीवनाचे विविध रंग खुलत राहोत आणि त्यांच्या साहित्यनिर्मितीतून रसिकांच्या मनात आशा, आनंद व सकारात्मकतेचा प्रकाश पसरत राहो.

**साहित्यिक गौरवाचा सुंदर क्षण**

माझी लेखणी साहित्य मंचाच्या वतीने कवयित्री उज्वला धर्माधिकारी यांना ''उज्वला शब्दज्योती'' हे साहित्यिक टोपणनाव बहाल करताना त्यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीस मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

त्यांची लेखणी अशीच अविरत तेवत राहो,

शब्दांतून विचारांचा प्रकाश पसरत राहो,

काव्यातून जीवनाचे विविध रंग खुलत राहोत,

रसिकांच्या मनाला त्यांच्या शब्दांचा स्पर्श होत राहो

आणि त्यांच्या साहित्यसेवेचा प्रकाश सर्वदूर पोहोचत राहो,

हीच मनःपूर्वक सदिच्छा!

कवयित्री उज्वला धर्माधिकारी यांचे ''उज्वला शब्दज्योती'' हे साहित्यिक टोपणनाव बहाल झाल्याबद्दल मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन!

**– श्री. संदीप विठ्ठल जगताप**
संस्थापक व अध्यक्ष
माझी लेखणी साहित्य मंच
शहापूर, जि. ठाणे, महाराष्ट्र राज्य

# टीम स्पोर्टिफाय च्या मनीष आणि राहुल यांनी लडाखमधील खारदुंग ला चॅलेंज २०२६ यशस्वीपणे पूर्ण

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - पुण्यातील टीम स्पोर्टिफायच्या दोन धावपटूंनी शुक्रवारी, ११ सप्टेंबर २०२६ रोजी लडाखमधील अत्यंत कठीण अशा ७२-किमी खारदुंग ला चॅलेंजची शर्यत यशस्वीपणे पूर्ण केली.

मनीष धामंगे यांनी ही अल्ट्रा मॅराथॉन ११:४६:२५ या प्रभावी वेळेत पूर्ण केली,तर राहुल गुरुंग यांनी १२:०७:४७ मध्ये शर्यत पूर्ण केली.अशा प्रकारे त्यांनी भारतातील सर्वाधिक आव्हानात्मक आणि उंचावरील (हाय-अल्टिट्यूड) सहनशक्तीच्या शर्यतींपैकी एक शर्यत यशस्वीरीत्या पार पाडली.

ही शर्यत धावपटूंना लडाखच्या खडतर भूप्रदेशातून,विशेषतः १७,हजार फुटांपेक्षा जास्त उंचीवर असलेल्या प्रसिद्ध खारदुंग ला खिंडीतून घेऊन जाते.प्रचंड उंची,विरळ हवा आणि कठीण भूप्रदेश यामुळे हे आव्हान धावपटूंच्या सहनशक्तीची आणि मानसिक खंबीरपणाची खरी कसोटी पाहणारे ठरते.




त्यांचे हे यश म्हणजे प्रशिक्षक विजय बनसोड आणि टीम स्पोर्टिफायच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या अनेक महिन्यांच्या समर्पित तयारीचे फळ आहे.या तयारीमध्ये लांब अंतराचे धावणे (लाँग रन्स ),डोंगराळ भागातील प्रशिक्षण (हिल ट्रैनिंग ),सहनशक्ती वाढवणारे व्यायाम आणि शर्यतीसाठी विशेष तयारी यांचा समावेश होता.

प्रशिक्षक विजय बनसोड म्हणाले, ''खारदुंग ला ही केवळ ७२-किमीची शर्यत नाही तर ती तयारी,संयम आणि मानसिक खंबीरपणाची कसोटी आहे. मनीष आणि राहुल यांनी प्रशिक्षणादरम्यान प्रचंड निष्ठा आणि जिद्द दाखवली.त्यांचे हे यश टीम स्पोर्टिफाय आणि पुण्यातील धावपटूंच्या समुदायासाठी अभिमानास्पद क्षण आहे.''

मनीष धामंगे ११:४६:२५ । राहुल गुरुंग १२:०७:४७

खारदुंग ला चॅलेंज २०२६ मधील या उल्लेखनीय कामगिरीबद्दल टीम स्पोर्टिफाय,पुणे यांनी दोन्ही धावपटूंचे अभिनंदन केले आहे.




## सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'पती-पत्नी' (संसार रथाची दोन चाके)

आपल्या भारतीय संस्कृतीत या नात्याला 'अर्धनारीश्वर' संकल्पनेचे उदात्त अधिष्ठान लाभले आहे. शिव आणि शक्ती जसे एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत, तसेच पती आणि पत्नी एकमेकांशिवाय अपूर्ण असतात. श्रीराम-सीता, विठ्ठल-रखुमाई यांच्यापासून ते इतिहासातील महर्षी कर्वे आणि बाया कर्वे, महात्मा गांधी आणि कस्तुरबा, सावित्रीबाई आणि जोतीराव फुले, बाबा आमटे आणि साधनाताई आमटे यांच्यापर्यंत... एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून समाज घडवणाऱ्या दांपत्यांची अनेक प्रेरक उदाहरणे आपल्यासमोर आहेत.

आजच्या धकाधकीच्या आणि विभक्त कुटुंब पद्धतीत पती-पत्नीचे नाते अधिक संवेदनशील झाले आहे. आज दोघेही नोकरी आणि संसाराची तारेवरची कसरत करत असताना एकमेकांना दिलेला वेळ, संयम आणि विश्वास हीच या नात्याची खरी ताकद ठरते.

उतारवयात जेव्हा मुले आपापल्या विश्वात रमतात, तेव्हा हातात हात घालून एकमेकांची काठी बनणारे आणि आठवणींत रमणारे हेच पती-पत्नीचे नाते अखेरपर्यंत सोबत राहते.

कविवर्य बा.भ. बोरकर आपल्या एका कवितेत जोडीदाराच्या विरहाचे दुःख मांडताना म्हणतात–

"तू गेल्यावर, घरात देखील पाऊल माझे अडखळते,
आणि आटुनी हवा भवतीची, श्वासास्तव मन तडफडते.
तू गेल्यावर, या वाटेने चिमणी देखील नच फिरके,
कसे अचानक झाले न कळे, सगळे जग परके परके..."

पती-पत्नीच्या नात्याचा हा पवित्र आदर्श भारतीय संस्कृतीने शतकानुशतके जपला आहे. नात्यांच्या या भरजरी 'महावस्त्रा'चा हा 'पती-पत्नी' नावाचा पदर विश्वासाचा, समर्पणाचा आणि अथांग प्रेमाचा सुगंध असाच सदैव दरवळत ठेवो!



## ॥ श्री गणेश चिंतन ॥

*समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"*

कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे

३. गणेशाचे डोळे आणि कान

समर्थ गणेशाचे लहान डोळे आणि मोठे कान वर्णन करतात. ते कान पंख्यासारखे हलतात, असे सुंदर रूपवर्णन आहे.

समर्थांनी–"लहान डोळे म्हणजे अमुक"
"मोठे कान म्हणजे तमुक"
अशी प्रतीकांची स्वतंत्र व्याख्या केलेली नाही.

म्हणून आपण गूढार्थ मांडू शकतो; पण तो "समर्थांनी सांगितलेला अर्थ" म्हणून मांडणे योग्य नाही. तर ...

डोळे – अंतर्मुख दर्शन
कान – श्रवण आणि वेदान्तीय साधनेत श्रवण → मनन → निदिध्यासन हा अत्यंत महत्त्वाचा क्रम आहे.

म्हणून गणेशाच्या विशाल कानांकडे पाहताना आपण म्हणू शकतो–
"ज्ञानप्राप्तीची सुरुवात ऐकण्यापासून होते; परंतु श्रवणाचे फल अंतर्बोधात झाले पाहिजे."

४. गणेशाच्या हातातील चार वस्तू

समर्थांची अत्यंत प्रसिद्ध ओवी–
शोभे फरश आणी कमळ ।
अंकुश तिक्षण तेजाळ ।
येके करीं मोदकगोळ ।
तयावरी अतिप्रीति ॥

चार हातांत–परशू – कमळ – अंकुश – मोदक
ही चार प्रतीके आहेत.

परशू छेदन करणारे आयुध.अज्ञान, आसक्ती, अहंकार यांचे छेदन.

कमळचिखलात उगवते पण चिखलात लिप्त होत नाही.
म्हणून–संसारात राहून अलिप्त राहणे.

अंकुशहत्तीला दिशा देणारे साधन.मनाच्या चंचल प्रवाहाला विवेकाची दिशा देणे.

मोदक"मोद" म्हणजे आनंद.म्हणून–
आत्मबोधातून येणारा अंतःसंतोष.

(पण पुन्हा स्पष्ट करणे आवश्यक आहे–ही तात्त्विक प्रतीकात्मक मांडणी आहे; समर्थांनी या चार आयुधांची अशी शब्दशः व्याख्या केलेली नाही.) चिंतनासाठी दिशा मिळावी हा उद्देश!

५. सर्वांत सुंदर विरोधाभास – स्थूल देह आणि अद्भुत चपळता

समर्थ गणेशाला विशाल, स्थूल, प्रचंड देहाचा दाखवतात; पण त्याच वेळी त्याच्या नृत्याची चपळता वर्णन करतात.

हे दृश्य किती सुंदर आहे!
स्थूल देह – पण अत्यंत चपळ चैतन्य.
यातून एक सुंदर आध्यात्मिक चिंतन करता येते (क्रमशः)

## विचार ते विजय



लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

### अति विचार आयुष्य कसं थांबवतो?

आपल्या डोक्यात दिवसातून कितीतरी विचार येतात. काय झालं असतं जर...?
उद्या काय होईल? मी घेतलेला निर्णय चुकला तर?
लोक काय म्हणतील? माझ्याकडून हे जमलं नाही तर?
एखादी छोटीशी गोष्ट घडते आणि आपण तिच्याभोवती शंभर प्रश्न उभे करतो.
प्रश्न संपत नाहीत... पण मनाचा शांतपणा संपतो.
यालाच आपण म्हणतो–अति विचार.
विचार करणं चुकीचं नाही. विचार आपल्याला निर्णय घ्यायला शिकवतात.
पण जेव्हा विचार करण्याऐवजी आपण त्याच गोष्टीचा पुन्हा पुन्हा विचार करत राहतो, तेव्हा विचार आपली ताकद बनत नाहीत...
तेच आपली कमजोरी बनतात. अति विचार आपल्याला समस्या सोडवायला शिकवत नाही...
तो आपल्याला त्या समस्येच्या भीतीत जगायला शिकवतो.
एखाद्या निर्णयाचा विचार करताना आपण अपयशाची दहा कारणं शोधतो.
आणि मग... ज्याची सुरुवातही केलेली नसते, त्याचा शेवट मनात करून टाकतो.
सगळ्यात दुःखाची गोष्ट म्हणजे–
आपण ज्या गोष्टीची भीती बाळगतो, त्यापैकी अनेक गोष्टी कधी घडतच नाहीत.
पण त्या न घडलेल्या गोष्टींचं दुःख आपण आधीच जगून घेतो. हीच अति विचारांची वेदना आहे.
काल हा धडा आहे, शिक्षा नाही. आणि उद्या ही संधी आहे, संकट नाही. म्हणून जेव्हा मनात विचारांचा गोंधळ सुरू होईल, तेव्हा स्वतःला एक प्रश्न विचारा–
"हा विचार मला उपाय देतोय की फक्त भीती?"
जर उपाय देत असेल तर कृती करा.
जर फक्त भीती देत असेल तर त्याला थांबायला सांगा.
लक्षात ठेवा– काल बदलता येत नाही आणि उद्या अजून आलेलं नाही. आपल्या हातात फक्त आज आहे. मग आजचा दिवस उद्याच्या कल्पित संकटात का जाळायचा?
अति विचार कमी करण्यासाठी पहिली गोष्ट म्हणजे–
जे आपल्या नियंत्रणात आहे त्यावर लक्ष द्या.
लोक काय म्हणतील, हे आपल्या हातात नाही.
पण आपण काय करणार, हे आपल्या हातात आहे.
परिणाम आपल्या हातात नाही.
पण प्रयत्न आपल्या हातात आहे.
समोरचा आपल्याला समजून घेईल की नाही, हे आपल्या हातात नाही. पण आपण प्रामाणिकपणे बोलू शकतो.
दुसरी गोष्ट– विचार कागदावर लिहा. मनात फिरणारा विचार कागदावर उतरला की त्याचं ओझं कमी होतं.
स्वतःला विचारा– "ही समस्या आत्ता माझ्यासमोर आहे का, की मी तिची कल्पना करतोय?" हा एक प्रश्न अनेक अनावश्यक भीती दूर करू शकतो.
तिसरी गोष्ट–
निर्णय घ्या आणि छोटं पाऊल उचला.
पूर्ण रस्ता दिसण्याची वाट पाहू नका.
पहिलं पाऊल टाका.
रस्ता पुढे दिसत जाईल.
कारण अनेकदा आपल्याला मार्ग दिसत नाही म्हणून आपण चालत नाही...
आणि आपण चालत नाही म्हणून मार्ग तयार होत नाही.
आयुष्य परिपूर्ण निर्णयांची वाट पाहत बसण्यासाठी मिळालेलं नाही.
चुका होतील.
काही निर्णय चुकतील.
काही लोक सोडून जातील.
काही स्वप्नं बदलतील.
पण त्यातून आपण शिकू.
थांबलेलं पाणी कुजतं; वाहणारं पाणी स्वच्छ राहतं.
मनालाही तसंच आहे.
विचारांना वाहू द्या...
पण त्यात अडकून राहू नका.
आज स्वतःला एक वचन द्या–
"मी प्रत्येक विचारावर विश्वास ठेवणार नाही."जेव्हा तुम्ही अति विचारांच्या शृंखला तोडून 'वर्तमानात' जगायला शिकाल आणि विचारांऐवजी कष्टाची कास धराल, तोच तुमच्या आयुष्यातील सर्वात मोठा 'विजय' असेल.ओझे बाळगणे थांबवा, मोकळा श्वास घ्या... आणि 'विचार ते विजय' या प्रवासात थांबलेले आयुष्य पुन्हा वेगाने पळवून दाखवा!

# एआय तंत्रज्ञानाचा महापूर

ज्योतिर्मय साहित्य

आज आपण अशा काळात जगत आहोत जिथे आपल्या सकाळची सुरुवात मोबाईलच्या स्क्रीनने होते आणि रात्रही त्याच स्क्रीनने संपते. आजचे युग हे खरंच संगणक आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) युग आहे. मोबाईलच्या एका क्लिकवर किंवा चॅटजीपीटी सारख्या साधनांना एक प्रश्न विचारला की सेकंदात तयार कविता, निबंध किंवा उत्तरं आपल्या समोर हजर असतात. हे सगळं पाहताना खूप आश्चर्य वाटतं, पण त्याच वेळी मनात एक विचार येतो की, ''जर सगळं काही मोबाईलवर आणि एका क्लिकवर मिळत असेल, तर मग आता पुस्तकांची काय गरज उरली आहे?'' मला वाटतं, हा प्रश्न आज आपल्या सगळ्यांच्याच मनात कधी ना कधी डोकावून गेला असेल. पण जसजसा मी यावर विचार करतो, तसतसं मला जाणवतं की तंत्रज्ञान कितीही पुढे गेलं, तरी पुस्तकांचं आपल्या आयुष्यातलं स्थान कधीच कमी होऊ शकत नाही. पुस्तक म्हणजे केवळ कागदांची जुळवणी नसते, तर तो मानवी मनाचा आणि खऱ्या ज्ञानाचा एक जिवंत ठेवा असतो. वाचन करताना मला नेहमी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे माहिती आणि ज्ञान या दोन्ही पूर्णपणे वेगवेगळ्या गोष्टी आहेत. एआय आपल्याला माहितीचा प्रचंड महापूर देऊ शकतं. इंटरनेटवर माहितीचे लाखो तुकडे विखुरलेले आहेत. पण त्या माहितीचं एका सुंदर ज्ञानात रूपांतर करण्याचं सामर्थ्य फक्त पुस्तकातच असतं. एखादं पुस्तक जेव्हा लेखक लिहितो, तेव्हा त्यात त्याच्या अनेक वर्षांचे अनुभव, त्याचे कष्ट, त्याचा आनंद आणि सखोल विचार दडलेला असतो. पुस्तक वाचताना आपण अगदी शांतपणे, स्वतःला वेळ देत त्या विषयाच्या मुळाशी जातो, त्यावर विचार करतो. याउलट, एआय ने दिलेली माहिती अनेकदा कोरडी आणि यांत्रिक वाटते. पुस्तकाची पानं चाळताना मिळणारी विचारांची जी सखोलता आहे, ती स्क्रीनवर भराभर स्क्रोल करताना कधीच मिळू शकत नाही.दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपली कल्पनाशक्ती. जेव्हा आपण एखादं कथा किंवा कादंबरीचं पुस्तक वाचतो, तेव्हा




आपलं मन नकळत एका वेगळ्याच दुनियेत हरवून जातं. पुस्तकातील शब्दांवरून आपण आपल्या डोक्यात एक स्वतःचं सुंदर जग उभे करतो. कथेतील पात्रांचे चेहरे कसे असतील, तिथला निसर्ग कसा असेल, हे आपण आपल्या कल्पनेने रंगवतो. ही प्रक्रिया आपल्याला विचार करायला लावते, आपल्या मेंदूला चालना देते. याउलट, एआय आपल्याला तयार उत्तरं आणि आयती चित्रं पुरवतं. यामुळे आपली स्वतःची विचार करण्याची क्षमता कुठेतरी आळशी बनत चालली आहे की काय, अशी भीती वाटते. पुस्तके आपल्याला कसा विचार करावा हे शिकवतात, तर एआय आपल्याला काय विचार करावा हे सांगण्याचा प्रयत्न करतं. म्हणूनच, आपल्या बुद्धीला धार लावण्यासाठी आणि वैचारिक समृद्धीसाठी मला पुस्तकांचे वाचन अतिशय आवश्यक वाटते. आजकाल आपला स्क्रीन टाईम (मोबाईल किंवा लॅपटॉप पाहण्याची वेळ) कमालीचा वाढला आहे. याचा परिणाम आपल्या आरोग्यावर आणि मनावर होत आहे. डोकेदुखी, मानसिक ताण आणि एकाग्रता न लागणे या समस्या आज आपल्याला पावलोपावली जाणवतात. अशा धावपळीच्या आणि गोंगाटाच्या काळात हातात घेतलेलं एखादं छापील पुस्तक मनासाठी अमृताचा घोट ठरतं. जेव्हा आपण हातात पुस्तक घेतो आणि मोबाईल बाजूला ठेवतो, तेव्हा आपण या आभासी जगातून दूर एका शांत ठिकाणी पोहोचतो. पुस्तकाची पाने उलटण्याचा तो हळुवार आवाज आणि पानावरील अक्षरांचा तो विशिष्ट सुवास मनाला एक वेगळीच शांतता देऊन जातो. मानसिक आरोग्य जपण्यासाठी आणि मन एकाग्र करण्यासाठी पुस्तकासारखा दुसरा निवांत मित्र असूच शकत नाही.पुस्तकांचं मला जाणवलेलं सर्वात मोठं आणि सुंदर वैशिष्ट्य म्हणजे ती आपल्यातील संवेदनशीलता जिवंत ठेवतात. एआय मध्ये कितीही बुद्धी असली, तरी शेवटी ते एक मशीन आहे, त्याला हृदय नसतं. ते मानवी दुःख, आनंद, प्रेम किंवा वेदना स्वतः कधीच अनुभवू शकत नाही. पण एखादी चांगली कादंबरी किंवा आत्मचरित्र वाचताना आपण त्या पात्राच्या सुख-दुःखाशी पूर्णपणे एकरूप होतो, आपल्या डोळ्यात पाणी येतं किंवा चेहऱ्यावर हसू उमलतं. पुस्तके आपल्याला माणसावर प्रेम करायला, इतरांबद्दल सहानुभूती बाळगायला शिकवतात. एआय मुळे जग जरी यंत्रासारखं धावत असलं, तरी माणसाला माणूस म्हणून जगवण्याचं आणि त्याच्या भावना जपण्याचं काम पुस्तकेच करत आहेत.तसेच, आजच्या इंटरनेटच्या युगात कोणती माहिती खरी आणि कोणती खोटी ( ), हे ओळखणं खूप मोठं आव्हान बनलं आहे. अशा वेळी पुस्तके हा एकच हक्काचा आणि विश्वासाचा मार्ग उरतो. पुस्तकातील ज्ञान हे व्यवस्थित तपासून, संपादन करून आणि जबाबदारीने लिहिलेलं असतं. शेकडो वर्षांपूर्वी आपल्या संतांनी किंवा विचारवंतांनी लिहिलेले विचार आजही आपल्याला योग्य मार्ग दाखवतात, कारण ते सत्याच्या भक्कम पायावर उभे आहेत.शेवटी, मला असं वाटतं की एआय हे माणसाने आपल्या मदतीसाठी तयार केलेलं एक उत्तम साधन आहे, ते माणसाची किंवा त्याच्या भावनांची जागा कधीच घेऊ शकत नाही. तंत्रज्ञान कितीही प्रगत झालं, तरी ते मानवी मनाची कोमलता आणि पुस्तकांची जागा घेऊ शकणार नाही. पुस्तके ही आपला भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांना जोडणारा एक सोनेरी पूल आहेत. एआय च्या या वेगवान युगात जर आपल्याला स्वतःचं अस्तित्व, वैचारिक स्वातंत्र्य आणि मनाची शांतता टिकवायची असेल, तर आपल्याला पुस्तकांच्या पानावरील अक्षरांना पुन्हा एकदा आपलंसं करावं लागेल. म्हणूनच, या डिजिटल क्रांतीत पुस्तकांचं महत्त्व तसूभरही कमी झालेलं नाही, तर ते अधिकच पवित्र आणि मोलाचं झालं आहे. ग्रंथ हेच गुरु हे कालही सत्य होतं, आजही आहे, उद्याही राहील.

विशेष...
दिलीप देशपांडे.
जामनेर. जिल्हा जळगाव.
८९९९५६६९१७
dilipdeshpande24@gmail.com



# भगवान महावीर यांनी सांगितलेले दशलक्ष पर्व

ज्योतिर्मय साहित्य

१) उत्तम क्षमा - आपण जीवनात अनेक चुका करतो, मात्र चुकीची जाणीव झाल्या नंतर मागे न सरकता किंवा कोण काय म्हणेल ? काय विचार करेल ? ह्याचा थोडा सुद्धा विचार न करता आपल्या मनाचा पक्का विचार करावा की कुणी क्षमा करो वा नक रो आपण मोठ्या मनाने इतरांना क्षमा मागणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे एखादा क्षमा मागत असेल तर त्याला उदार अंतःकरणाने क्षमाकरून त्याचा मान राखला पाहिजे. कारण उत्तम क्षमेचे सृजन करा आणि क्षमा धारण करा . कारण क्षमे पेक्षा मोठा कोणताच धर्म पालनाचा संकेत नाही. ह्या प्रकरणी भगवान महावीर यांच्या तत्वात प्रथम प्राधान्याने समजावले आहे. त्यांच्या अभ्यासातून त्यांनी सांगितले आहेकीं , क्षमा मागितल्या ने इतराना नव्हेतर स्वतःला लाभ होईल. आपण अज्ञान दशेत राग लोभाचे समर्थन करतो पण क्षमावान मनुष्य कधिच कोणा विषयी द्वेश भाव ठेवित नाही.

आर. पी. दुसे
छ. संभाजी नगर 9422202747



वैरभाव त्याच्या मनात ठरत नाही. संसारीक मनुष्य अज्ञानाच्या दशेत द्वेशाचे प्रसंगी आपापल्या विचारा प्रमाणे समर्थन करण्याचा प्रयत्न करतो. द्वेश भाव मनात असलेला मनुष्य क्षमाभाव मनात ठेवू शकत नाही. वास्तवीक हे चुकीचेच वर्तन आहे. कारण क्षमा वान मनुष्य आपल्या जीवनातील द्वेशाची आहूती क्षमारूपाने अग्नि देवतेला समर्पीत करत असतो. आणि सुख समाधान प्राप्त करीत असतो. त्यामुळे तो सुखी आणि तणाव रहीत राहू शकत असतो. संकटावर मात करण्याची ऊर्जा त्यांच्या अंगी येत असते.

महावीर यांच्या ह्या शिकवणी चे सर्वांनी आत्म मनन चिंतन करावे आणि सर्व जीवांना मी क्षमा करतो आणि सर्व जीवा नी मला क्षमा करावी, सर्व जीवाशी माझा शुद्ध, निस्वार्थ मैत्री भाव रहावा आणि कुणाशीही वैरभाव राहू नये. ही अपेक्षा बाळगावी. दश लक्षण पर्व ह्या साठीच मानले जाते. उत्तमक्षमेला प्राधान्य महावीरानी दिलेले आहे. त्यानंतर मार्दव, आर्जव, सत्य. शौच, संयम, तप, त्याग, आकिंचन व ब्रम्हचर्य ह्यालक्षणांचा क्रमाने पालन करण्याचा यशस्वी प्रयत्न करावा.

महावीर पुढे सांगतात की क्षमा आणि सहानुभूतीचा वापर केल्यास आपले मन प्रांजळतेने भरून येण्यास वेळ लागत नाही. ज्याचे मन प्रांजळ तेने भरलेले असते, तो भव सागरातून आनंदाने मुक्त होवू शकतो. शांती मित्र बनविते तर अशांती शत्रू बनविते तसेच समस्या निर्माण होण्याचे कारण म्हणजे आपली कठोर आणि दुसऱ्याचे मन दुखावणारी शद्ब वाणी प्रकर्शाने होवू शकते. भाषा जर मधूर, अमृतमय, असेल तर जगातील सर्व समस्या संपुष्टात येवू शकतात. त्याच प्रमाणे आपल्या वाणी प्रमाणे आपली क्रिया शिलता असावी म्हणजे त्याचा जास्त प्रभावशील उपयोग होवू शकतो. ज्याप्रमाणे वाणी मध्ये परिवर्तन शक्ती अंतर्भूत आहे तद्वतच क्षमा करण्यात मोठी शक्ती दडलेली आहे. हे लक्षात ठेवले पाहिजे की , क्षमा करून आपण इतरावर उपकार करत नाहीत तर त्या पासून आत्म समाधानाचे सौख्य प्राप्त करीत असतो शिवाय ज्याच्या अंगी क्षमा करण्याची ताकद असते मनात संयम असतो आणि वाणी मध्ये अमृत गोडवा आहे त्याला आनंदी जीवनाचा लाभ सहजतेने मिळण्यास हरकत नाही.

# पद्मश्री डॉ. कोल्हे दाम्पत्यांची दुधभाते नेत्रालयाला सदिच्छा भेट

## अत्याधुनिक नेत्रसेवा आणि 'फिरता नेत्र दवाखाना' उपक्रमाचे कौतुक

ज्योतिर्मय साहित्य

पुणे : पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे आणि पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांनी डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटरला सदिच्छा भेट देऊन तेथील अत्याधुनिक नेत्रतपासणी व उपचार सुविधांची माहिती घेतली. नेत्रालयाच्या माध्यमातून ग्रामीण आणि गरजू नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'फिरता नेत्र दवाखाना'

( मोबाईल आय क्लिनिक) या उपक्रमाबद्दलही त्यांनी विशेष समाधान व्यक्त केले.

या भेटी दरम्यान डॉ. रवींद्र कोल्हे आणि डॉ. स्मिता कोल्हे या दोघांचीही आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने सविस्तर नेत्रतपासणी करण्यात आली. तपासणीसाठी वापरण्यात येणारे अद्ययावत तंत्रज्ञान, तपासणीची पद्धत तसेच रुग्णांना उपलब्ध करून दिलेल्या सुविधांची त्यांनी माहिती घेतली.

नेत्रालयाचे संचालक व प्रख्यात नेत्रतज्ज्ञ डॉ. अनिल दुधभाते यांनी कोल्हे दाम्पत्याचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच डोळ्यांचे आरोग्य व नेत्रविकारांविषयी माहिती देणारे आपले स्वलिखित 'नेत्रकोष हे पुस्तक त्यांना भेट दिले.



डॉ. दुधभाते नेत्रालयाच्या वतीने गेल्या पाच वर्षांपासून मोफत फिरता नेत्र दवाखाना उपक्रम राबविण्यात येत आहे. या माध्यमातून आतापर्यंत एक हजारांहून अधिक मोफत नेत्रतपासणी शिबिरे घेण्यात आली असून, ग्रामीण भागातील दहा हजारांहून अधिक शालेय विद्यार्थ्यांची मोफत नेत्रतपासणी करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. ग्रामीण भागापर्यंत नेत्रआरोग्य सेवा पोहोचविणाऱ्या या उपक्रमाबद्दल कोल्हे दाम्पत्याने आनंद व्यक्त केला.

नेत्रालयातील विविध विभाग, वैद्यकीय उपकरणे, स्वच्छता आणि रुग्णसेवेची कार्यपद्धती यांचीही त्यांनी पाहणी केली. डॉक्टर व कर्मचारी रुग्णांशी आपुलकीने आणि संवेदनशीलतेने संवाद साधत असल्याचे नमूद करत त्यांनी कर्मचाऱ्यांच्या कामाचे कौतुक केले.

''वाढती लोकसंख्या आणि प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर नेत्ररुग्णांना तपासणीपासून उपचारांपर्यंतच्या आधुनिक सुविधा एकाच छताखाली उपलब्ध होणे आवश्यक आहे. डॉ. दुधभाते नेत्रालयात अशा स्वरूपाच्या सर्वसमावेशक सेवा उपलब्ध आहेत,'' असे डॉ. रवींद्र कोल्हे यांनी सांगितले.

डॉ. स्मिता कोल्हे यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानासोबत रुग्णकेंद्रित दृष्टिकोन महत्त्वाचा असल्याचे नमूद केले. डॉ. अनिल दुधभाते यांच्या वैद्यकीय व सामाजिक कार्याबरोबरच नेत्रालयाच्या व्यवस्थापनाचेही त्यांनी कौतुक केले. ''आरोग्यसेवा आणि सामाजिक कार्याला आयुष्य समर्पित केलेल्या कोल्हे दाम्पत्याची भेट आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या शब्दांमुळे ग्रामीण व गरजू घटकांपर्यंत नेत्रसेवा अधिक व्यापकपणे पोहोचविण्याची प्रेरणा मिळाली,'' असे डॉ. अनिल दुधभाते यांनी सांगितले. यावेळी साहित्यिक श्री. गिरीश वसेकर, श्री. नितीन पाटील, श्री. राजेंद्र शेळके, शीतल हिराळकर आणि अंकुर दुबे उपस्थित होते.

## आदरणीय गुरु नाट्याचार्य श्रीमती आशा सुनील कुमार

लेखिका: डॉ मीना श्रीवास्तव ठाणे मो. 99201 67211





पुढे.....

इथे कुठलाच शॉर्टकट नसल्यामुळे, काही पालक आणि त्यांची मुले अस्वस्थ होऊन प्रशिक्षण अर्धवट सोडतात.

आधुनिक बॉलीवूड-शैलीतील नृत्यप्रकार शिकण्यासाठी लागणारा कमी वेळ, तसेच समाज माध्यमांचा प्रभाव, विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचे लक्ष विचलित करू शकतात. अशा परिस्थितीत ते शास्त्रीय कलाप्रकारांच्या प्रशिक्षणात अनेक वर्षे गुंतवण्याच्या आपल्या निर्णयावर पुनर्विचार करू शकतात. नृत्याची, विशेषतः भरतनाट्यमची व्यवसाय म्हणून निवड करणे हा एक अतिशय धाडसी निर्णय वाटतो, तरीही त्यांच्या मोजक्या विद्यार्थिनींनी या कलेसाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करण्याचा निर्णय घेतलाय. विविध ठिकाणी होणाऱ्या शास्त्रीय नृत्य कार्यक्रमांसाठी प्रायोजकत्व मिळवणे ही एक मोठी समस्या आहे. इथे पालकांच्या योगदानाला मर्यादा असतात आणि प्रेक्षक दीर्घकाळ चालणारे शास्त्रीय नृत्य कार्यक्रम पाहण्यास उत्सुक असतीलच असे नाही. लक्ष्यित प्रेक्षकवर्ग असलेल्या कार्यक्रमांसाठी प्रायोजक शोधणे आणखीनच अवघड होते.

मात्र या आव्हानांवर यशस्वी मात करून, गुरु नाट्यचार्य आशा संपूर्णपणे सकारात्मक राहिल्या आहेत आणि आपल्या गुणी विद्यार्थीनींच्या सादरीकरणासाठी त्या सतत नवनवीन संधी शोधत असतात. उत्साही शिष्यांच्या नव्या गटाला स्वतःच्या खास पद्धतीने प्रशिक्षण देण्यासाठी त्या सज्ज आहेत, कारण आपले आदरणीय गुरु 'कलैममणी' टी. के. महालिंगम पिल्लई आणि इतर गुरूंकडून आत्मसात केलेल्या या अभिजात नृत्यप्रकाराचा सर्वोच्च दर्जा टिकवून ठेवण्यावर त्यांचा दृढ विश्वास आहे.

त्यांच्याशी संवाद साधत असतांना मी एका निष्कर्षावर सहजरित्या पोहोचले की त्यांच्या रोमारोमात भरतनाट्यम नृत्य भिनले आहे.

अलौकिक नाट्यसेवेच्या माध्यमातून भरतनाट्यममधील सर्वोत्तम कला सादर करण्याची या 'आशा' ची उत्स्फूर्त ऊर्मी मला पदोपदी जाणवत होती. भरतनाट्यम या अभिजात नृत्यप्रकाराच्या संवर्धनासाठी अथक परिश्रम करणाऱ्या या गुरु नाट्याचार्य आशा सुनील कुमार, यांना मी विनम्र अभिवादन करते. ■ ■ ■




जैन पर्युषण पर्व
2026

भाद्रपद शुक्ला त्रयोदशी, {दिनांक २४ सप्टेबर २०२६}

नवम आत्मधर्म : उत्तम अकिंचन्य धर्म

उत्तम अकिंचन्य धर्म या आत्म स्वभाव लक्षणांमध्ये स्व-पर भेद विज्ञान अपेक्षित आहे. उत्कृष्ट ज्ञान, दर्शन, चारित्र्य या स्वरूपा शिवाय अन्य कोणते ही आपले शाश्वत रूप नव्हे, एक आत्म्या शिवाय अन्य कुठले ही द्रव्य स्वरूप आपण नव्हेत, असे चिंतन करणे उत्तम अकिंचन्य धर्म आहे. स्व आणि पर काय आहे याचा विवेक व्हावा. अकिंचन म्हणजे यत्किंचित ही अंतर बाह्य ममत्व बुद्धी नसणे.

याचाच अर्थ सर्व भौतिक संग्रह, परिग्रह पासून निवृत्त होणे, शुभ ध्यान करण्याची शक्ती आत्मसात होणे, परवस्तूवरील ममत्व भावाने रहित होणे, सम्यक दर्शन ज्ञान आणि चारित्र्याने युक्त होणे उत्तम अकिंचन अवस्था आहे. अर्थात स्व मध्ये स्थिर होणे.

विश्वामध्ये आज पर्यंत जितके ही आत्मा मुक्तीला प्राप्त झाले आहेत ते सर्व याच अवस्थेमधून गेलेले असतात. पुनर्रपी जन्म मरण आणि संसाररूपी दुःख यातून मुक्त होत असतानाची ही अखेरची अवस्था आहे. म्हणून आत्म्याच्या दशलक्षण स्वभाव धर्मामध्ये अकिंचन हा भाव अति महत्त्वाचा म्हणून अखेरीस येतो.

विज्ञानाचा नियम आहे की जे हलके होते ,ज्याचे वस्तुमान कमी, ज्या वरील जडत्वाचा अधिकार कमी होतो ते वर जाते. येथे वर जाते म्हणजे ऊर्ध्वगामी असा अभिप्राय आहे. सर्व प्रकारचा संग्रह परिग्रह नष्ट व्हावा, ममत्व भाव न्यूनतम व्हावा, स्व आणि पर काय आहे ही विवेक बुद्धी जागृत व्हावी, आणि केवळ उज्वल अशा स्व म्हणजे आत्मस्वरूपा कडे मार्गस्थ व्हावे, याचा श्रेष्ठ अभ्यास म्हणजे आकिंचन्य अवस्था. सर्व पर द्रव्याचा बोध सोडून मात्र आत्म स्वभावामध्ये स्थिर होणे हाच उत्तम अकिंचन्य धर्म आहे. जीव आत्म्याचे हे सर्वश्रेष्ठ स्वरूप आहे.

बलराज संघई, छत्रपती संभाजीनगर 9420015108



आम्ही तुमचे पुस्तक प्रकाशित करू !

ज्योतिर्मय प्रकाशन

प्रत्येक लेखकाचं एकच स्वप्न असते ते म्हणजे माझ्या कवितांचे, लेखांचे, कथांचे, कादंबरीचे पुस्तकात रूपांतर व्हावे व ते जास्तीतजास्त वाचकांपर्यंत पोहोचावे, मग हे स्वप्न आम्ही पूर्ण करू. उत्कृष्ट छपाई, साजेसे मुखपृष्ठ अगदी कमी वेळेत व अगदी बिनचूक. मग वाट कसली बघता तुमचे स्वप्न पूर्ण करा ज्योतिर्मय प्रकाशन सोबत. लगेच कामाला लागा व आम्हाला खाली दिलेल्या नंबरवर संपर्क करा.

ज्योतिर्मय प्रकाशन
▪ पुणे ▪ छ. संभाजीनगर

संपर्क : 7743 81 8559



ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# जेन झी : बदलत्या काळाची बदलती पिढी

**ज्योतिर्मय साहित्य**
(मागील अंकावरून)

दुसरा पर्याय म्हणजे काही कारणांमुळे आजी-आजोबांचा पर्याय उपलब्ध नसेल, तर मुलांना डे-केअरमध्ये ठेवले जाते. अनेक पालकांसाठी डे-केअर आवश्यक सुविधा आहे, याबाबत दुमत नाही. पण अशावेळी कितीही नको म्हटले तरी त्या मुलांचे संगोपन काही काळ दुसऱ्याच व्यक्तींकडून होते. त्यामुळे अशी अपत्ये मोठी होताना भावनिकदृष्ट्या एकटी पडू लागतात. त्यांच्या मनात एक प्रकारची पोकळी निर्माण होऊ शकते आणि हळूहळू त्यांची भावनिक ओढ आई-वडिलांपासून दूर जाऊ लागते. आपलं मुलं कितीही चांगल्या ठिकाणी वाढत असलं, तरी त्याला माझे आई-बाबा माझ्यासाठी आहेत ही भावना आवश्यक असते.

त्यातही याच काळात जेन झी च्या हातात मोबाईल फार लवकर आला. आम्ही जेन मिलिनिअल्स म्हणजेच साधारण १९८१ ते १९९६ या काळात जन्मलेली पिढी, आम्ही मोठं होत असतांना साध्या फोन पासून ते आजच्या स्मार्टफोनचा प्रवास अगदी जवळून पाहिला आहे. आम्ही एक-दोन जीबी डेटामध्ये संपूर्ण महिना काढायचो; आणि आज दोन-तीन जीबी डेटा दररोज वापरण्याची सुविधा सहज उपलब्ध झाली आहे. जेन झी च्या हातात मोबाईल फार लवकर येण्यामागे कोरोनाच्या काळातील ऑनलाइन क्लासेस हेही एक महत्त्वाचे कारण ठरले. ऑनलाइन शिक्षणामुळे लहान वयातच मुलांचा मोबाईलशी संपर्क वाढला. मात्र, एवढ्यात तर माझा आणखी एक नवीन गोष्ट निरीक्षणात आली ती म्हणजे आजचे आधुनिक मम्मी-पप्पा आपल्या लहानशा मुलाला शांत करण्यासाठी अगदी लहान वयातच त्याच्या हातात मोबाईल देतात. त्यावर कार्टून किंवा रील्स लावून दिल्या जातात. मुलाच्या हातात मोबाईल असला की ते रडणे थांबवते; मोबाईल हातात असला की ते जेवते. पण ही किती चुकीची पद्धत आहे, याचा आपण कधी विचार करतो का?

अशा पद्धतीने अवघ्या १-२ वर्षांच्या वयापासूनच मुलाला मोबाईलची सवय लागते. मी याबद्दल आधीही लिहिले आहे की, रील्स सतत स्क्रोल करणे किती चुकीचे आणि घातक आहे. उदाहरणार्थ स्क्रोल करतांनी एका रीलमध्ये विनोदी प्रसंग असतो, तर लगेच दुसऱ्या रीलमध्ये भावनिक प्रसंग असतो आणि त्यानंतर अचानक भीती निर्माण करणारी तिसरी रील समोर येते. म्हणजेच काही सेकंदांच्या अंतराने आपल्या मेंदूसमोर वेगवेगळ्या मानवी भावना मांडल्या जातात. काही सेकंदांत भावनांची दिशा बदलते. हसू दुःख भीती उत्साह राग पुन्हा मनोरंजन. या सततच्या आणि अतिशय वेगवान भावनिक बदलांमुळे आपल्या मनाला आणि मेंदूला एका भावनेतून दुसऱ्या भावनेत क्षणार्धात जाण्याची सवय लागते. अशा प्रकारच्या सततच्या इमोशनल शिफ्टिंगचा आपल्या मानसिक आणि भावनिक आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अशा प्रकारच्या रील्सपासून शक्यतो प्रत्येक पिढीने दूर राहणे गरजेचे आहे. मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर पूर्णपणे टाळणे कदाचित शक्य नसेल; मात्र त्याचा वापर किती, कशासाठी आणि कोणत्या वयापासून करायचा, याबाबत पालकांनी आणि मुलांनी दोघांनीही सजग असणे अत्यंत गरजेचे आहे.

या जनरेशन मध्ये होत असलेल्या बदलावा बद्दल लिहितच आहे तर हल्लीच जगभरातील तसेच देशभरातील काही घडामोडी ज्यांनी विशेष लक्ष वेधलं त्यातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे जेन झीतील हा बदल केवळ त्यांच्या वैयक्तिक जीवनात दिसत नाही; सामाजिक आणि राजकीय प्रश्नांवर आवाज उठवण्याची पद्धतही या पिढीने मोठ्या प्रमाणावर बदलून टाकली आहे. पूर्वीच्या आंदोलनांमध्ये घोषणा, भाषणे, मोर्चे आणि पोस्टर्स यांना महत्त्व असायचं. आज मात्र आंदोलनाची भाषाही डिजिटल झाली आहे. रील्स, मीम्स, लघुचित्रफिती, प्रचलित ध्वनी आणि उपरोध यांच्या माध्यमातून गंभीर सामाजिक आणि राजकीय प्रश्न काही सेकंदांत लाखो लोकांपर्यंत पोहोचवण्याची क्षमता या पिढीने दाखवून दिली आहे. गेल्या काही विद्यार्थी आंदोलनांमध्ये समाजमाध्यमांचा वापर करून परीक्षा व्यवस्था, बेरोजगारी आणि प्रशासनातील त्रुटींविषयी आवाज उठवला गेला. या आंदोलनांमधील अनेक चित्रफिती खरोखरच कौतुकास्पद होत्या. काही तरुणांनी अत्यंत प्रभावीपणे आपले प्रश्न मांडले, व्यवस्थेतील त्रुटींवर प्रश्न



उपस्थित केले आणि आपल्या हक्कांसाठी आवाज उठवला. पारंपरिक माध्यमांवर अवलंबून न राहता स्वतःचा आवाज थेट समाजापर्यंत पोहोचवण्याची ही क्षमता निश्चितच जेन झीची ताकद आहे.

परंतु या चित्राची दुसरी बाजूही दुर्लक्षित करता येणार नाही.

आंदोलनाच्या काळात समाजमाध्यमांवर काही अशा चित्रफितीही मोठ्या प्रमाणावर फिरतांना दिसल्या, ज्यामध्ये राजकीय नेत्यांविषयी अत्यंत आक्षेपार्ह किंवा शिवराळ भाषा वापरली गेली. या मध्ये अजून एक विशेष चिंताजनक बाब ही समोर आली की, मुली सुद्धा बिनधास्त शिवीगाळ करताना दिसून आल्या. हे पाहून खरंच खूप वाईट वाटले. काही ठिकाणी आंदोलनाच्या गंभीर विषयापेक्षा प्रसिद्ध होण्याची, व्हीवर्सची संख्या वाढवण्याची आणि लक्ष वेधून घेण्याची स्पर्धा अधिक जाणवली. इथे एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो आपल्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य हवे आहे की अभिव्यक्तीच्या नावाखाली कोणतीही भाषा वापरण्याचे स्वातंत्र्य? लोकशाहीमध्ये पंतप्रधान असो, मुख्यमंत्री असो किंवा कोणताही राजकीय नेता असो त्यांच्या निर्णयांवर टीका करण्याचा प्रत्येक नागरिकाला अधिकार आहे. चुकीच्या धोरणांविरोधात आवाज उठवणं, प्रश्न विचारणं, आंदोलन करणं आणि सरकारला जबाबदार धरणं ही लोकशाहीचीच लक्षणं आहेत. परंतु टीका आणि अपमान, आक्रमकता आणि असभ्यता, निर्भीडपणा आणि शिवराळपणा यांच्यामध्ये एक सूक्ष्म पण अत्यंत महत्त्वाची रेषा असते. ही रेषा पुसली गेली तर प्रश्न केवळ राजकारणाचा राहत नाही; तो आपल्या सामाजिक संस्कारांचा प्रश्न बनतो. एखाद्या विचाराला विरोध करण्यासाठी त्या व्यक्तीचा अपमान करणं आवश्यक नसतं. एखाद्या धोरणाला विरोध करण्यासाठी शिवीगाळ करण्याची गरज नसते. आपला संताप व्यक्त करण्यासाठी सभ्यता सोडावीच लागते असंही नाही. खरं तर शब्दांमध्ये ताकद असेल तर आवाज चढवण्याची गरज नसते; विचारांमध्ये वजन असेल तर शिवीगाळ करण्याची गरज नसते. मला असं वाटते ही जे आक्षेपार्ह भाषा वापरली गेली त्यामागे कारण असे आहे की, आजकाल मुव्हीज, वेब सीरिज, स्टँड अप कॉमेडी शो, रोस्ट शो इ. मध्ये शिवीगाळ करणे फारच सामान्य होतं चालले आहे. शिवी देतो म्हणजे आपण कूल आहोत, असे समजले जाऊ लागले आहे आणि हेच या पिढीच्या मनावर देखील बिंबविल्या जात आहे, हे कुठे तरी थांबायला हवं!

प्रा. कौशिक म. हरणे
नूतन महाराष्ट्र एस्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, पुणे
मो.क्र: ९६७३१७५१९७



या सर्व बदलांच्या पार्श्वभूमीवर दोन पिढ्यांमधील अंतर वाढवण्याऐवजी त्यांच्यामध्ये संवादाचा पूल उभा करणं ही आजची खरी गरज आहे. जेन झीला सतत तुम्ही चुकीचे आहात असं सांगण्यापेक्षा त्यांना योग्य प्रश्न विचारायला शिकवण्याची गरज आहे. त्यांच्यावर जुन्या पिढीचे विचार लादण्याऐवजी अनुभव आणि नवीन विचार यांच्यात संवाद निर्माण करण्याची गरज आहे. आणि हा संवाद केवळ समाजात किंवा शाळा-महाविद्यालयांमध्येच नव्हे, तर घरातही सुरू होण्याची गरज आहे. पालकांनी मुलांशी केवळ त्यांच्या गुणांबद्दल, परीक्षांबद्दल किंवा करिअरबद्दल बोलू नये. त्यांना त्यांच्या मित्रांबद्दल विचारावं. त्यांच्या आवडी-निवडी समजून घ्याव्यात. त्यांच्या मनात काय चाललं आहे हे जाणून घ्यावं. ते समाजमाध्यमांवर काय पाहतात, कोणत्या गोष्टी त्यांना प्रभावित करतात आणि कोणत्या गोष्टी त्यांना अस्वस्थ करतात, याबद्दल त्यांच्याशी मोकळेपणाने बोलावं. मुलांवर लक्ष ठेवणं आणि मुलांशी संवाद साधणं यात फरक आहे. नुसतं कुठे होतास? विचारण्यापेक्षा आजचा दिवस कसा गेला? असं विचारणं अधिक महत्त्वाचं आहे. मुलांना सतत सूचना देण्यापेक्षा कधी कधी त्यांचं शांतपणे ऐकून घेणं अधिक आवश्यक आहे. कारण पालकत्व म्हणजे केवळ मुलाला मोठं करणं नाही; त्याला समजून घेत स्वतःही पालक म्हणून मोठं होणं आहे.

आचार्य चाणक्यांनी चाणक्यनीतीमध्ये मुलांच्या संगोपनाबाबत एक महत्त्वाचा विचार मांडला आहे

''लालयेत् पञ्चवर्षाणि दशवर्षाणि ताडयेत् ।प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रं मित्रवदाचरेत् ।।''

अर्थात, मुलाला पहिली पाच वर्षे प्रेमाने आणि लाडाने वाढवावे, पुढील दहा वर्षे शिस्त आणि संस्कारांनी घडवावे आणि वयाची सोळा वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्याच्याशी मित्राप्रमाणे वागावे. आजच्या काळात सुद्धा या विचाराचा आदर्श घेत त्यामागचा पालकत्वाचा दृष्टिकोन समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहेमुलांना केवळ सुविधा देण्यापेक्षा त्यांना वेळ, संवाद, शिस्त, संस्कार आणि भावनिक आधार देणे हीच पालकांची खरी जबाबदारी आहे. अखेरीस जेन झीकडे पाहताना तिला दोष देणं किंवा तिचं अति कौतुक करणं या दोन्ही टोकांपेक्षा तिला तिच्या काळाच्या संदर्भात समजून घेणं अधिक आवश्यक आहे. या पिढीच्या हातात तंत्रज्ञान आहे; पण त्या तंत्रज्ञानाला दिशा देणारे संस्कार कोण देणार? त्यांच्या हातात स्मार्टफोन आहे; पण त्यातून काय पाहायचं हे कोण शिकवणार? त्यांच्याकडे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे; पण त्या स्वातंत्र्याचा जबाबदारीने वापर कसा करायचा हे कोण समजावणार? या प्रश्नांची उत्तरं केवळ शाळा, महाविद्यालय किंवा समाजाकडे नाहीत. त्याची पहिली जबाबदारी कुटुंबाची आहे. हे चुकीचं ते बरोबर असं सरळ सांगितल्या पेक्षा, चुकीचं का चुकीचं आहे आणि बरोबर का बरोबर आहे हे सांगणे महत्त्वाचे आहे म्हणजे चूक आणि बरोबर यातला फरक समजून सांगायचा आहे.

मी प्राध्यापक म्हणून नेहमी या जेन झीच्याच संपर्कात असतो आणि म्हणूनच एक गोष्ट तुम्हाला खात्रीने सांगू इच्छितो ती म्हणजे ही मुलं आपलं म्हटलेलं ऐकतात बस गरज आहे फक्त त्यांच्याशी संवाद साधण्याची त्यांना समजून घेण्याची. मुलाला खुशाल महागडं शिक्षण द्या; पण त्याच्याशी दोन शब्द मनापासून बोला. त्याला उत्तम मोबाईल देणं सोपं आहे; पण मोबाईलशिवाय वेळ घालवायला शिकवणं कठीण आहे. त्याला सुरक्षित वातावरण देणं महत्त्वाचं आहे; पण त्याला योग्य-अयोग्य ओळखण्याची क्षमता देणं त्याहून महत्त्वाचं आहे. ज्येष्ठ पिढीकडे अनुभव आहे आणि जेन झीकडे वेग, तंत्रज्ञान आणि नवीन कल्पना आहेत. एकीकडे भूतकाळाचा अनुभव आहे; दुसरीकडे भविष्याची स्वप्नं आहेत. या दोन्हींचा संवाद झाला, तर पिढ्यांमधील अंतर कमी होऊ शकतं. जेन झीला बदलण्याची गरज नाही;

तिला समजून घेण्याची गरज आहे. आणि कदाचित पालकांनीही स्वतःला हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे की आपण आपल्या मुलाला जगण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी देतो आहोत; पण त्याला जग समजून घेण्यासाठी आवश्यक असलेला आपला वेळ देतो आहोत का? कारण जेन झीची सर्वात मोठी गरज कदाचित नवीन तंत्रज्ञान नाही. तिला हवी आहेदिशा. तिला हवा आहेसंवाद. तिला हवी आहेसमजूत. आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजेतिला हवी आहेत अशी माणसं, जी तिचं ऐकून घेतील.

आज जेन झीकडे स्मार्टफोन आहे, इंटरनेट आहे, कॅमेरा आहे आणि काही सेकंदांत लाखो लोकांपर्यंत पोहोचण्याची ताकद आहे. पण या सर्वांपेक्षा महत्त्वाचं साधन आहेनैतिकतात, मूल्य आणि विवेक. कारण या जनरेशन साठी प्रसिद्ध होणं, आयुष्यात यशस्वी होणं ही उपलब्धी असू शकते; पण विचारपूर्वक, जबाबदारीने आणि सभ्यपणे प्रसिद्ध होणं, यशस्वी होणं हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे. सोबतच हे पण समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे की प्रसिद्ध होणे

किंवा यशस्वी होणे हीच एक उपलब्धि नसून शांततेने कोणाचेही नुकसान न करता, कोणाचेही मन न दुखवता संयमित जीवन जगणे पण कोणत्याही उपलब्धी पेक्षा कमी नाही. पालकांनी देखील जेन झीला समजून घेण्यासाठी त्यांच्या हातातील मोबाईलकडे पाहण्यापेक्षा त्यांच्या डोक्यातील विचार समजून घेणं अधिक महत्त्वाचं आहे. या पिढीला घडवितांना फक्त या जमान्यातील मुलं बदलली आहेत असं म्हणण्यापेक्षा, आपण त्यांना घडवितांना काय बदल केले पाहिजे? हा प्रश्न प्रत्येक पालकाने, प्रत्येक शिक्षकाने आणि प्रत्येक ज्येष्ठाने स्वतःला विचारण्याची गरज आहे.

कारण ही फक्त नवी पिढी नाही; ही नव्या जगाची पहिली पिढी आहे.

# गजाननाचे प्रतिकात्मक रूप

**ज्योतिर्मय साहित्य**
(मागील अंकावरून)

व्यावहारिक व मानसशास्त्रीय महत्त्व :

उत्तम श्रवणशक्ती : सुपासारखे कान सांगतात की माणसाने ऐकण्याची क्षमता मोठी ठेवली पाहिजे. समाजात वावरताना स्तुती, निंदा, अफवा आणि उपयुक्त सल्ला सर्व काही कानावर पडते.

कचरा बाहेर फेकणे: ऐकलेल्या प्रत्येक गोष्टीवर प्रतिक्रिया न देता, नकारात्मकता, टीका आणि निरर्थक गोष्टी मनातून बाहेर फेकून द्याव्यात. फक्त सकारात्मक, उपयुक्त आणि नैतिक ज्ञानच आत्मसात करावे.

६. गोपनीयता आणि सहनशीलता: विशाल उदर (लंबोदर)प्रतिकात्मक अर्थ:

गणपतीचे मोठे पोट म्हणजे केवळ खाद्यान्न साठवण्याची जागा नसून, ते सहनशीलता आणि गोपनीयता याचे प्रतीक आहे.

व्यावहारिक व मानसशास्त्रीय महत्त्व :

पोटात पचवणे: सुपासारख्या कानांनी जे काही ऐकले आहेमग ते कोणाचे गुपित असो, कोणाची टीका असो किंवा कटू अनुभव असो, ते सर्व विशाल उदरात साठवून ठेवणे, म्हणजे ते पचवणे होय.

संयम : आयुष्यात चांगले-वाईट दोन्ही प्रकारचे प्रसंग पचवण्याची ताकद माणसाकडे हवी. ऐकलेली प्रत्येक गोष्ट लगेच दुसऱ्याला सांगून वाच्यता न करता, गुपिते राखणे हे परिपक्वतेचे लक्षण आहे.

७. संयम आणि विचारपूर्वक पावले: लहान पाय*

प्रतिकात्मक अर्थ:



विशाल शरीराच्या मानाने गणपतीचे पाय लहान आणि स्थिर असतात. हे लहान पाय संयम आणि उतावीळपणाचा अभाव दर्शवतात.

व्यावहारिक व मानसशास्त्रीय महत्त्व :

घाई टाळणे : उतावीळपणे घेतलेले निर्णय नेहमी अंगलट येतात. लहान पाय माणसाला सांगताात की, आयुष्याची वाटचाल करताना घाईघाईने पळू नका.

नियोजित पावले : प्रत्येक पाऊल विचारांती, स्थिर आणि जमिनीवर ठेवून टाकावे. लहान पाय हे स्थिरतेचे प्रतीक आहेत, जे माणसाला अहंकाराने हवेत उडू देत नाहीत.

८. संबंध जोडणे आणि गोडवा: उंदीर हे वाहन प्रतिकात्मक अर्थ : अवाढव्य गणपतीचे वाहन अत्यंत लहान असा उंदीर आहे. हा विरोधभासच या प्रतीकाचे सौंदर्य वाढवतो. उंदीर हा चपळता, प्रत्येक बारीक जागेत शिरण्याची क्षमता आणि निरंतर प्रयत्न यांचे प्रतीक आहे.

व्यावहारिक व मानसशास्त्रीय महत्त्व:

माणसे जोडणे: उंदीर जसा कोणत्याही लहान छिद्रातूनही घरातील कानाकोपऱ्यात पोहचतो, तसे माणसाने सामाजिक जीवनात सहज मिसळले पाहिजे. नम्रतेने आणि प्रेमाने प्रत्येकाच्या हृदयात स्थान मिळवून माणसे जोडली पाहिजेत.

फुंकर घालून चावणे (कौशल्याने मार्गदर्शन): उंदीर चावताना फुंकर घालतो, ज्यामुळे वेदना जाणवत नाहीत. यातून अतिशय सुंदर सामाजिक संदेश मिळतो. जर आपल्याला कोणाची चूक दाखवून द्यायची असेल, तर ती सर्वांसमोर ओरडून किंवा त्याला दुखावून सांगू नये. अतिशय प्रेमाने, आदर राखून आणि त्याला वाईट वाटणार नाही अशा प्रकारे कौशल्याने (फुंकर घालून) मार्गदर्शन करावे.

९. अपवादाचा नियम : ''अर्थात हे सगळेच बाबतीत शक्य होईल असे नसते, कारण प्रत्येक गोष्टीला अपवाद असतातच.''

तत्त्वज्ञानाची जोड :

व्यावहारिक वास्तव : आदर्श तत्त्वज्ञान आणि व्यावहारिक आयुष्य यात नेहमीच थोडा फरक असतो. प्रत्येक वेळी माणसाला सुपासारखे कान ठेवून शांत राहता येत नाही, किंवा प्रत्येक वेळी उंदरासारखी फुंकर मारून सांगणे काम करत नाही. कधीकधी कठोर पावलेही उचलावी लागतात.

विभावरी कुलकर्णी
पुणे मो. ८०८७८१०१९७



परिस्थितीनुसार बदल : अपवाद हे नियमाला अधिक बळकट करतात. गणपतीनेही असुरांचा नाश करताना संहारक रूप धारण केले होते. म्हणजेच, तत्त्वे पाळताना परिस्थितीचे भान ठेवणे हीसुद्धा गजाननाचीच बुद्धी आहे.

श्रीगणेश ही केवळ पूजेची मूर्ती नसून, मानवी जीवन सुखी, समृद्ध आणि नीतिमान बनवणारा एक लिव्हिंग गाईड आहे.

पार्वतीचा मळ आणि युद्ध आपल्याला अहंकाराचा नाश करायला शिकवते.

लहान डोळे सूक्ष्म निरीक्षणाची सवय लावतात.

लांब सोंड दूरदृष्टी देते.

एकदंत आत्मविश्वासाची प्रेरणा देतो.

सुपासारखे कान विवेक बुद्धी देतात.

विशाल उदर पचवण्याची ताकद देते.

लहान पाय संयम शिकवतात.

उंदीर माणसे जोडण्याची आणि प्रेमाने सुधारण्याची कला शिकवतो.

या प्रतिकात्मक अर्थांचा स्वीकार करून जर आपण आपले जीवन जगलो, तर आपल्यातील अहंकारी बालक गळून पडून, तिथे ज्ञानी आणि सुजाण गजानन नक्कीच प्रकट होईल!




## गणरायास दुष्काळ निवारण साठी साकडे!

**ज्योतिर्मय साहित्य**

यावर्षीच्या कुलस्वामिनी प्रतिष्ठान गणेश मंडळ तर्फे ४१ फुटी इको ग्रीन गणेश देखावा करण्यात आला असुन देखावा पाहण्यास भक्त मंडळी गर्दी करत आहेत.

याच ठिकाणी अध्यक्ष विलास कोरडे यांनी दोन बोन्साय झाडाच्या गणेश आकाराच्या खोडातून दोन गणपती साकारले असुन, राज्यभर कमी पाऊस झाल्याने या गणेशाना दुष्काळ निवारणास व बळीराजास मदत करण्यासाठी प्रार्थना केली आहे.

हे दोन्ही गणेश बोन्साय झाडात अवतरले असुन ते नक्कीच आशीर्वाद देतील असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# ॥ज्योतिर्मय॥
# दीपावली - 2026

## आनंदाचे डोही आनंद तरंग....

**प्रकाशन 20 ऑक्टोबर 2026 विजया दशमी च्या मुहुर्तावर**

दीपावली हिंदू मनामनातील सर्वात मोठा सण. दीपावली म्हणजे सर्वत्र आनंदी आनंद गडे, दीपावली हा असा सण आहे की लहान थोरापासून ते आजोबा आज्जी पर्यत सर्वच आनंदाने उजळून निघतात. सर्वत्र प्रसन्न वातावरण, फराळाची रेलचेल, नवीन कपडे, नवीन खरेदी, नवीन प्रकल्प, नवीन योजना, नवे मित्र-मैत्रिणी, सुट्टीची धमाल, आणि वाचनीय दिवाळी अंक हे अनेक वर्षापासून चालत आलेलं न बदललेलं एक सुखाचं समीकरण.

बदलत्या आधुनिकीकरणाने खूप साऱ्या गोष्टी बदलत आहेत, बद्दलले आहेत पण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो सर्व भारतीय संपूर्ण जगात अतिशय उत्साहात साजरा करतात.

दिवाळी आणि दिवाळी अंक हे समीकरण शेकडो. वर्षापासून चालत आलेलं आहे आणि ते अखंड चाल्तं राहणार, कारण दिवाळी अंकाशिवाय दिवाळी अधुरी आहे.

"ज्योतिर्मय दीपावळी" या नावातच सर्व काही सामावलेलं आहे, साहित्यांनी नटलेला संपूर्ण कुटुंबासाठी कुटुंबातील प्रत्येकासाठी या अंकात खूप काही असणार आहे.

त्यासाठी **ज्योतिर्मय साहित्य**च्या सर्व साहित्यिकांना आवाहन आहे की ग्मांनी त्यांचे दर्जेदार साहित्य **15 सप्टेंबर 2026 पर्यत** – sanjayvyapari@gmaii.com या ई-मेल आयडीवर किंवा **7743818559** या व्हाट्सअप वर पाठवावे.

- तुमच्या साहित्यावर "ज्योतिर्मय दीपावली" करिता लेख, किंवा कविता अशा स्पष्ट उल्लेख करावा.
- प्रत्येक साहित्यिक एक आर्टिकल व एक कविता पाठवू शकतो किंवा फक्त दोन कविता पाठवू शकतो.
- साहित्यावर लेखकाचा संपूर्ण पत्ता, पिनकोडसह असणे आवश्यक आहे.

## दिवाळी अंकासाठी विषय

1. मोबाईलचा अतिरेक
   (उप विषय)
   1. मोबाईलचा लहान मुलांवर होणारा परिणाम
   2. मोबाईलचा तरुण वर्गावर होणारा परिणाम
   3. स्क्रीन टाईम किती असावा
   4. वाहनात किंवा वाहनावर मोबाईल वापरणे धोक्याचे.
   5. मोबाईलमुळे एकटेपणा वाढला.
   6. मोबाईल संदर्भात कोणताही विषय
2. भारतीय सण
   (उप विषय)
   1. भारतीय सण आणि त्यामागील भूमिका
   2. सण - माणसांना जोडणारा दुवा
   3. मंदिरे आणि व्यवसायीकरण
3. माझे आठवणीतील पर्यटन
4. A I प्रणाली - फायदे / तोटे
5. देव माणसातच आहे
6. शाळेतील आठवणी
7. आज्जी आजोबांच्या गोष्टी हरवल्या
8. संस्काराचे महत्व
9. बाल साहित्य
10. इतर कोणताही सकारात्मक विषय

**दिवाळी अंक प्रकाशनापूर्वीच पोस्टाद्वारे पाठविण्यात येईल.**
एका अंकासाठी ₹.500
व त्यापेक्षा जास्त अंकासाठी पुढील प्रत्येक अंकासाठी + ₹300 रुपये पडतील.
दिवाळी अंकाचे पेमेंट 100 टक्के ॲडव्हान्स लागेल.

**पेमेंट पाठवण्याची माहिती**
ज्योतिर्मय प्रकाशन
ऑनलाईन फोन पे नंबर
पे 7743818559
या नंबरवर पाठवावे व पेमेंट पाठवल्याचा स्क्रीनशॉट त्याच व्हाट्सअप नंबरवर पाठवावा.

**सर्वांना लेखनासाठी खूपखूप शुभेच्छा!**

- संपादक,
**ज्योतिर्मय दीपावली**
पुणे | छ. संभाजीनगर
मो. 7743918559, 7743818559

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559